# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL 5 AKOLA :—SATURDAY EVENING— JULY, 16 1870 NO 26

पुस्तक ५ अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १६ माहे जुलै सन १८७० इ०. अंक २६

## गणेश शास्त्री मालवणकर.

आम्हांस लिहिण्यास वाईट वाटतें कीं पुण्याचे असिस्टंट जज्ज मि. बेकर साहेब यांनीं रा० गणेश शास्त्री मालवणकर यांजवर सेशनांत खोटया साक्षीचे गुन्ह्याची शाबिदी ठरवून तीन महिने सक्त मजुरीनिशी कैदेची त्यांस शिक्षा दिली. आतां हिजवर अपिलास मार्ग आहे व त्या प्रमाणें ते कदाचित अपिल करतील ही.

हे गणेश शास्त्री सुधारणा मार्गास यथेच्छ आडवे जाणारे होते ह्मणून त्यांस दहशत बसली किंवा त्यांची अप्रतिष्ठा झाली तर चांगलें असें पुनर्विवाह पक्षास प्रथम दिवसांपासून वाटत होतें व मालवणकराचें करणीस आम्हीही दोष दिला आहे हें आम्हांस आठवतें, परंतु तो वेळ आतां राहिला नाहीं. पुनर्विवाह पक्षानें गणेश शास्त्री यांस कित्येक वेळां कोर्टाचे दारीं नेलें, खर्चाचे पेचांत आणिलें, कैदेच्या शिक्षेवर घातलें व त्यांच्या दैवानें तें दंडावर गेलें, पुढें त्यांनीं दांतीं तृण धरिलें, माफी मागितली व इतकेंही झाल्यावर इंदुप्रकाशानें त्यांजवर आणखी फिर्याद केली व तिचा निकाल होणें अजून शिल्लक आहे तों दुसरेच खटल्यांत त्यांस ही शिक्षा झाली. आजचे प्रसंगीं ही त्यांस फार भारी शिक्षा आहे. पुनर्विवाह अशास्त्र असें निर्णयपत्र झालें, शंकराचार्याचा छळ झाला, निषेधकास अशी शिक्षा दिली गेली, यावरून पुनर्विवाह पक्षास बिलकुल सहाय न होतां विरुध्धपक्षांत हळहळ, व तिटकारा अधिक माजेल व त्यापासून पुनर्विवाह पक्षास नुकसान येईल. म्हणून आम्ही म्हणतों कीं, उत्तेजक पक्षानें कायद्याच्या बाजूकडे इतकी ओढ धरिली हे चांगलें केलें नाहीं. आतां अजून तरी पंडित विष्णुशास्त्री यांनीं आपल्या फिर्यादीचा राजिनामा द्यावा हें बरें, असें आम्हांस वाटतें.

बिलायतेंत वगैरे धर्माचे कामांत धांदल झाल्याप्रसंगीं सुधारकांचे व जुन्या मतवाद्यांचे मोठाले वाद झाले व कित्येक पुरुषांचीं शिरकमलें त्यापायीं वाहिलीं गेलीं अशा गोष्टी इतिहासांत आहेत पण आमचे देशांत असा प्रसंग आमचे पाहण्यांत अजून आला नव्हता व इतक्या थरास हा येईल असें आह्मांस वाटलेंही नव्हतें. गणेश शास्त्री यांचे विच्यार व मतें आह्मांस अगदी मान्य नाहींत तथापि त्यांनीं केवळ धर्माचे कामीं आपलें घरदार, मुलेंबाळें, व चाकरी सोडून इतका आपला निग्रह दाखविला, वर्षभर महत्प्रयास केले, व शेवटीं तुरुंगाच्या शिक्षेची यातनाही भोगिली, शाबास! ही शिक्षा त्यांस भूषणकारकच समजावयाची. कारण त्यांनीं कोठें चोरी केली नाहीं, कोणाच्या घरावर दरवडा घातला नाहीं, किंवा कोणाचा खून करून ते कैदेंत गेले नाहींत, अगर कोणी सावकारांनीं ऋणाकरितां त्यांस कैदेंत घातलें नाहीं, धर्माचे कामीं ते झटत होते व आपलीं शास्त्रमतें आणि शंकराचार्यांची अनुज्ञा हीं सांगत होते तेव्हां त्यासंबंधी पवित्र संसर्गांत त्यांनीं अपवित्र आणि सर्व प्रकारच्या दुराचारी लोकांचें माहेर घर जो भयंकर तुरुंग त्यांत वस्तीस जावें हा मोबदला फार असुखकारक व लोकांचे मनांस कळवळा आणणारा होय व त्यापासून पुनर्विवाह पक्षास कांहीं चांगलें निष्पन्न होणार नाहीं असें आह्मांस वाटतें.

जेथें दुफळी झाली तेथें अभिप्रायाचे लेख दोन्ही बाजूचे पाहिले म्हणजे तिव्हाइतास मोठा चमत्कार वाटतो. मित्रोदयानें लिहिलें आहे कीं:—

दुःखप्रदवर्तमान. आम्हास लिहिण्यास फार वाईट वाटतें कीं, पुनर्विवाह निषेधक पक्षाचे धुरंधर व खरे धर्माभिमानी रा. रा. गणेश बापुजी मालवणकर, [ शास्त्री ] यांस पुण्याच्या सेशनांत ३ महिने सक्त मजुरीनिशी कैदेची शिक्षा झाल्याचें अश्रुत्रावी वर्तमान शहरांत पसरलें आहे. अरेरे! विचारा आचारसंपन्न, वेदशास्त्रप्रकाशित, सत्यवादी, स्वधर्मनिरत, गुरुभक्तिपरायण, | अस्खलित वक्ता, असा पूज्यपाद पुरुष निगडबद्ध होऊन कैदी या विशेषणास पात्र व्हावा काय?

याच संबंधानें ज्ञानप्रकाशांत लिहिलें आहे कीं, गणेश मालवणकर ज्या खोटें बोलण्यावरून तुरुंगांत गेला त्याचा तर धर्माशी मुळींच संबंध नव्हता. तो केवळ आपला डौल व आपला थोरपणा राखण्याकरितां व टवाळी करण्याच्या हेतूनें खोटें बोलला असें दिसतें. खोटें बोलून धर्माचें पुष्टीकरण करणें हें ब्राम्हण पुष्ट करण्याकरितां गाय मारण्यासारखें आहे. व धर्माकरितां खोटें बोलणें हें लोकांचे डोळ्यांत माती टाकणें आहे.

## वर्तमानपत्राचें हाशिल.

आमच्या महाराष्ट्र देशांत नित्याचें मराठी वर्तमानपत्र चांगलें न चालण्यास कोण कोणत्या अडचणी आहेत त्याविषयीं थोडे आठवड्यामागें आम्हीं लिहिलें होतें त्यांतच सरकारानें हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांवर टपालचें हाशिल अधिक ठेविलें आहे ही एक अडचण दाखविली होती, तीविषयींच आज थोडा अधिक विचार करूं.

देशांत वर्तमानपत्रें जीं आहेत तीं राजांचीं साहकारी आहेत. वर्तमानपत्रांचें विद्या, कलाकुशलता, सुधारणा, चातुर्य, सद्गुण प्रस्ताव, दोषप्रकटीकरण, अनेक विषयोद्घाटन, महत्विक वार्ताप्रसिद्धी इत्यादि देशाच्या बऱ्यासाठीं जीं सत्कृत्यें आहेत तीं अमोलिक व अनुपम होत. व त्यांपासून राजाचा एवढा उपयोग आहे कीं, तीं ज्या राज्यांत नाहींत तें राज्य अंधळें म्हटलें जाईल. ज्या राज्यांत वर्तमानपत्रास मोकळीक नाहीं तें राज्य जुलमी असें मानिलें जातें. इंग्लिशलोकांच्या देशांत तर वर्तमानपत्र ही चवथी सत्ता मानिलेली आहे. म्हणजे प्रथम राजसत्ता दुसरी व तिसरी पार्लमेंट सत्ता व चवथी वर्तमानपत्रसत्ता समजतात. आणि ज्या लोकांच्या जन्मदेशांत असा नियम पाळिलेला आहे त्याच लोकांचें हिंदुस्थानांत राज्य आहे तर इकडेही त्यामानानें वर्तमानपत्रास श्रेष्ठत्व त्यांनीं दिलें पाहिजे व अंशतः दिलेंही आहे हें आम्हीं कबुल करितों. कारण मागें मराठी शाही, पेशवाई, मोंगलाई कारकीर्दींत अशीं वर्तमानपत्रें कोठें होतीं? व वर्तमानपत्रांतून कधीं कधीं आलीकडे सरकारचे दोष दाखविले जातात असे त्याकाळीं दाखविण्यास कोणास धैर्य होतें? व कोणी दाखविताच तर तो जीवंत तरी राहता काय? नाहीं. त्याच्या जीवितावर व सर्व संपत्तीवर केवळ हल्ला झाला असता. म्हणून इंग्लिशांनीं वर्तमान पत्रास ही जी स्वतंत्रता दिली आहे तीकरितां आपण त्यांचे उपकार मानू. आतां वर्तमानपत्रकर्ते मात्र चांगले निपजले पाहिजेत व त्यांनीं त्या स्वतंत्रतेचें चीज, लोकांचा उपयोग आणि देशाचें कल्याण केलें पाहिजे, अस्तु. अशा प्रकारचें देशास उपयुक्त साधन जें वर्तमानपत्रें त्यास सरकारानेंही चांगले प्रकारें सहाय दिलें पाहिजे, व त्याच्या अडचणी दूर केल्या पाहिजेत.

आतां सरकाराकडून वर्तमान पत्रास [illegible]पें अडचण लटली ह्मणजे टपालच्या हाशिलाची आहे. व तिजविषयीं ठिक ठिकाण[illegible]या वर्तमानपत्रकर्त्यांनीं पुष्कळ गिल्ला [illegible]ला आहे तरी सरकार तिकडे का[illegible]नच देतनाहीं हें तिखट कानाचें पोचट बहिरेंपण चमत्कारिक नव्हे काय? आम्ही म्हणतों कीं वर्तमान पत्रावरील डाक हाशि[illegible] कमी केलें तर त्यांत सरकारचा तोटा बहुधा होणार नाहीं. कारण हल्लीं डा[illegible]कहशील जबरदस्त असल्यामुळें वर्तमानप[illegible]चा खप फार होत नाहीं, व हाशील कमी झालें ह्मणजे तो अधिक होईल व सरकारचा एकंदरींत जमा खर्च बरोबर होईल. आणि यदाकदाचित कांहीं उत्पन्न कमी झालें तर सरकार मायपोट आहे. दुसऱ्या एकंदर कोट्यावधि रुपयांच्या हिशेबांत याची सरकारानें भरती करून घ्यावी. सरकार उदार मनाचें व थोर आहे ह्मणून त्यानीं हें सत्वर करावें असें वर्तमानपत्रकर्त्यांचें एक मागणें आहे व दुसरें, असें मागण्यास त्यांस एक हल्लींचें उदाहरण झालें आहे. तें हें कीं बिलायतेंत वर्तमानपत्रांवर जें हाशिल होतें तें कमी करण्याचा ठराव केला आहे; म्हणजे पुढील महिन्या पासून तिकडे दर वर्तमान पत्रास च्यार पै हाशिल घेणार आणि आमचे इकडे आज कित्येक वर्षें जें बारा पै हाशिल बसविलेलें आहे तें सरकार कमी करण्याचा विच्यार अजून करित नाहीं, हा न्याय नव्हे. आतां वसुल जमेचा हिशेब तिकडील व इकडील अधिक उणा असेल हें आम्हीं जाणतों, पण त्यामुळें आमच्या हक्कांत जो सरकार भेद करितें तो असह्य होय. सबब सरकारानें दोन्ही देशांत वर्तमानपत्रांच्या हक्काची समानता राखिली पाहिजे. भेद ठेविल्यास तो काळ्या व गोऱ्या कातडीचा भेद असें लोक समजूं लागतील,' तर तसें न व्हावें याविषयीं सरकारानें जपलें पाहिजे. आतां हें खरें आहे कीं हिंदुस्थानचीं वर्तमानपत्रें अजून बाल्य स्थितींत आहेत व विलायतेंतील त्यांहून फार प्रौढ आहेत. तरी पण त्यामुळेंही सरकारानें असा उलटा भिन्न भाव धरणें बरोबर नाहीं. बालांस समजूत कमी असते म्हणून त्यांस गोडी गुलाबीनें खुशी ठेवावें लागतें, त्यांस संतोष होई असे पदार्थ द्यावे लागतात, त्यांपासून कांहीं हिरावून घेतां [illegible] येत नाहीं, तसें केलें तर [illegible] कमी होई[illegible] [illegible] प्रयासानें करावी लागते, व [illegible]का आयास आणि खटाटोप प्रौढा विषयीं करावयास नको. तीं कार्यकारण समजून संतुष्ट राहतात. आणि दुसरी मुख्य गोष्ट अशी पहा कीं डाकेचे हाशिलाच्या करांचें हें वर्तमानपत्रांवर ओझें आहे, आणि ओझें सहन करण्यास प्रौढास जितकी शक्ती असते तितकी बालास असत नाहीं हा विचार तर सरकारानें प्रथम पहिला म्हणजे. तथापि, आमचें असें म्हणणें नाहीं कीं, विलायतेच्या वर्तमानपत्रांवर अधिक हाशिल बसवा आणि आम्हांवर कमी बसवा. आमचें सरकारास नम्रता पूर्वक जें मागणें आहे तें इतकेंच कीं, विलायतेंस जें हाशिल ठेवलें आहे तेंच दर पत्रास च्यार पईचें हाशिल आमचे इकडील वर्तमानपत्रांवर ठेवून तद्वारें आमच्या देशावर कृपाकरा, कृपाकरा.

## मृत्यूच्या शिक्षेची मनाई.

हालंड देशाच्या राजानें आपल्या राज्यांत अतःपर मृत्यूची शिक्षा द्यावयाची नाहीं असा नियम केला आहे. हा चांगला होय. खुनी अपराध्यास राजदंडार्थ मृत्यूची शिक्षा देण्याचा संप्रदाय आहे. परंतु दयालु बुध्धीचा आणि दूरदृष्टीचा आलीकडे असा एक विचार निघाला आहे कीं, मनुष्य मारल्याच्या मोबदला त्या मारणारास आणखी ठार मारणें म्हणजे एक मेला तो मेलाच व दुसराही जगांतून आणखी नाहींसा करणें आहे. व मनुष्याच्या जीवापेक्षां दुसरी कोणतीहि

गोष्ट आधिक नाहीं. आणि यास मृत्यूची शिक्षा दिल्यानें पहिला मेलेला मनुष्य परत येतो असें नाहीं सबब फांशीची शिक्षा देण्याचें मोबदला जन्मपर्यंत कैद, काळे पाणी वगैरे शिक्षा ठरवावी व राजदंडार्थ मनुष्य मारूं नये असा हालंड सरकारानें आपल्या राज्यांत कायदा घातला हा योग्य होय. व पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांनीं असें केल्यास बरें होईल.

## मयूरादि पक्षी व वणवा

याविषयीं अन्योक्ति.

—o—

( वसंततिलका छंद )

विद्युल्लता गच सख्या कण हे दर्शवे।
हे कडकडाट उठती मधुनी शिलांचे ॥
हा मेघ जाणुनि पुढें पळती कशाला।
तारा दया न असते तिळही अशाला ॥

( शार्दूलविक्रीडित छंद. )

पक्षांची सुषमा महा विविधिही मंजूळ
गाणें सर्से। नेत्रें नाजुक चर्म काय
शरिरीं अद्भुत शोभा वसे ॥ ऐसी
पाहुनियां नयेचि करुणा किसी पहा
त्या दवा। सारंगा परपोषकां खगव
रा धावे कुठें जाय ना ॥ २ ॥
जे जे त्वद्दर्शनीं पडेल गिळिशी तें
तोहि वैश्वानरा। दुष्ट क्रूरमुखें सुखें
गट करी पाहे न मागें जरा ॥
सौंदर्यें मधुर स्वरें युत अशा नाना
विहंगीस या। रक्षी दग्ध करी न तूं
करि सख्या वाड्यावरी ही दया ॥३॥

( वसंततिलका [illegible] )

[illegible] त नाते
त्वां जाळिलेस निव[illegible] ते।
झाले पहा पुनरपी सकला महीते
नें आम्र चंदन तरु जळती दवा ते।
काळांतरींहि नच पावति अंकुरांतें ॥४॥

( शिखरिणी छंद )

तुवां आटोपील्या वनिं दवादिशा
वृक्ष सगळे। तुझी ज्वाळा दुष्टा
गगनभर धुंडीनाचि पळे ॥ अहा
ऐशा वेळेमाधिं गवसुनी दुःख करितो।
दवा आतां कोठें पिकें नभग जाई
ल तरि तो ॥ ५ ॥
पिकातें संरक्षी मधुर तर गाणें श्रव
णि घे। विचार क्रूरांच्या ह्रदयिं अ
यवा कोठुनि रिघे ॥ न हा तूझा
दोष स्थिय मानिं दवा मी चुकतसें।
कुबुद्धीच्या योगीं तिळभरहि साफ
ल्य न वसे ॥ ६ ॥
सुगंधानें युक्ता अग सकल स्यातें
शिरि धरी। अशा नाना वेली ज
ळुनि पडल्या कीं महिवरी ॥ अहा
आतूनीही सकल दिसती निर्मुल
कता। दवा कोणी ऐसी तुज
नद दिली क्रूरपणतां ॥७ ॥

( वसंततिलका छंद. )

येहा! तुझ्या जवळ बोध करावयातें।
तत्काळ वा करिशि तूं स्वसमान
आतें ॥ या कारणास्तव दवा न
मितों पदास। येईल तें तव मना
करिं आपकाश ॥ ८ ॥ ज्ञा. द.

---

१ वणवा. २ दगड. ३ शोभा. ४ नामप्रकारचे. ५ नामकपक्षी. ६ कोकिला. ७ अथवा. ८ मुर्खी. ९ अग्नि. १० युक्त. ११ पक्षी. १२ उगवले. १३ कोकिळा. १४ वेली.

## वऱ्हाड.

पहिले पृष्ठावर आम्हीरा० गणेश शास्त्री मारबणकर यांजविषयीं लिहून गेल्यावर काल रोजीं बुधवारचा पुण्याचा ज्ञानचक्षु आम्हांस मिळाला, त्यांत लिहिलें आहे कीं त्यांनीं हाय कोर्टास अपील केलें आहे व त्याची चौकशी होऊन अखेर ठराव होई पर्यंत त्यांस १२ वे तारखेस दोन प्रहरीं जामिनावर मोकळें केलें आहे. आतां ते कायमचे मुक्त होतील तर बरें होईल. एक कलमक तुरुंगांत बस्ती त्यांनीं केलीच —दुसरें या पत्रांत आणखीं असें लिहिलें आहे कीं गणेश शास्त्री यांजवर खोटा कागद करून चालविल्याचे, व अन्नू घेत त्याचे मुकदमे आहेत ते १६ वे तारखेस निघणार आहेत. आतां त्याचे काय निकाल होतात पाहू. साधारण ह्मण अशी आहे कीं धर्माचें काम म्हणजे पोकळ त्यांत कांहीं जोर नाहीं, भट भिक्षुक ह्मणजे निर्बल, त्यांत कांहीं पौरुष नाहीं, व नवीन विद्येनें प्रकाशित म्हणजे सुधारलेले तस्मात नीतिमान व दयाळु होत. परंतु या कामांत सर्व उलटें झालें आहे. धर्माची बाब ही पोकळ तिनें साऱ्या राष्ट्रांस वेत खिळें आहे. भट भिक्षुक निर्बल पण गणेश शास्त्री व शंकराचार्य या भटांनीं या प्रसंगीं जें पौरुष दाखविलें आहे तें महा योध्याण्याही पौरुषास हार जाणार नाहीं व विद्वान आणि सुधारल्या लोकांनीं मिशनरी लोकांचें सौम्य उदाहरणाची कोटि न घेतां ते गरमपणा करून भयंकत झाले तेणेंकरून त्यांची निर्दयता प्रकाशित झाली. हाच या सर्व गोष्टीचा भावार्थ मतें इत्यर्थ दिसतो.

पुण्यास सरकारी नेटिव कामदारांचे मार्गी सुदर्शन लागलें आहे अशी वार्ता कळते डिपटिकमिशनरचे रेव्हिन्यु शिरस्तेदार मि० चिरागुद्दीन हे गेल्या आठवड्यांत एथें आले व या आठवड्यांत स्वदेशी नगर गेले. कोणी म्हणतात त्यांनीं तीन महिने रजा घेतली, व कोणी दुसरेंच बात. जुडिशल शिरस्तेदार रा. रामकृष्णपंत यांचि पर्यीही कांहीं चांगलें वर्तमान ऐकण्यांत आलें नाहीं. डिपुटिकामिशनर मेळाडीइस साहेब हे देऊळगावास मार खुनाच्या तपासास गेले होते तेव्हां त्या पल्या आफिसापैकीं कोणासही बरोबर नेले नव्हते असें ऐकतो. यावरून निकट प्रस्तुतची स्थिति तपशिलवार कळण्याचें सर्वांचें लक्ष लागलें आहे. पण या वड्यांत आमच्या बातमीदाराकडून म्हांस कांहींच कां लिहून आलें नाहीं मेला कळें.

ले० ट्रेव्हर साहेब हैदराबादचे आसि० रेसिडेंट रजेवर गेल्यामागें खालीं लिहिले ल्या गृहस्थांस बढती मिळाली.

ले० जे ई अलेक्झांडर आफिशियेटिंग सेकंड क्लास आसि. कमि. होते ते आफि. फर्स्ट क्लास अ. क. झाले—क्या. सी बोडहीस आफि. थर्ड क्लास असि. क. हे आफि. सेकंड क्लास अ. क. झाले.

क्या. मे नी बेल साहेब उमरावतीचे आफिशि. सेकंड क्लास डिपुटि कमिशनर व ले. कर्नल मे टी बुशबी यवतमाळ थर्ड क्लास डिपुटि कमिशनर हे तीन तीन महिन्याच्या रजेवर गेले आहेत त्यांच्या रजा येत्या आठवड्यांत २१ वे तारखेस पुऱ्या होणार आहेत.

लेफ. के जे एल मेकंजी जूनचे ११ वे तारखेपासून कपाटन झाले.

मि० एच काटेम्रव व मि० ई मोफट आफिशियेटिंग डिस्ट्रिक्ट पोलिस सुपरइंटेंडेंड हे हायर स्टयांडर्डच्या परीक्षेत पास झाले. आता यांस देशभाषेच्या परीक्षा पुन्हा दिल्या पाहिजेत.

मि० ती एस फाही आफिशि० थर्ड ग्रेड असि० पोलिस सुप० हे लोअर स्टयांडर्डच्या परीक्षेत पसंत ठरले. यांसही देशभाषेची परीक्षा पुन्हा दिली पाहिजे.

कोणी बेसनदी युरोपियन कामदार हिंदुस्थानांत मरण पावतात व त्यांविषयीं त्यांचे आप्तसंबंधी विलायतेंत सरकारास माहिती पुसतात तेव्हां त्याकडे ती आलेली नसते म्हणून स्टेट सेक्रटरींनीं हिंदुस्थान सरकारास लिहिलें आहे कीं असे कामदार मरण पावतांच त्यांचे वरिष्ठ तुम्हांकडे जलद माहिती देत जातील व ती तुम्ही आम्हांकडे पाठवित जाल अशी तजवीज ठेवावी.

क्या० मी मेकंजी वऱ्हाड मोजणीकडील असि० सुप० बी दप्तरचें काम पाहू लागले.

कारंजास सब राजिष्टरचें आफिस झालें आहे त्याकडे कामरगाव परगण्याचे १६ गाव, नर्भा परगण्याचे १३ गाव, पापळ परगण्याचे ८ गाव, आणि कारंजे परगण्यापैकीं ५४ गाव दिले आहेत.

उमरावती जिल्ह्यांत मोर्शी या गावास पोलिसासंबंधी सन १८६१ च्या ५ व्या आक्टाचें ३४ वें कलम लागू केलें.

मि० आर डब्ल्यु बोहहौस पूर्व वऱ्हाडातील एक्शिक्युटिव इंजिनियर यांस तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली. व ते रजेवर असतील तोंपर्यंत मि० एच डेंजरफील्ड आसि० इंजिनियर हे त्यांचें काम पहातील

रेलवे कंपनीनें या महिन्याचे १८ तारखेपासून खामगाव शाखेवर आगगाड्या चालविण्याचें बंद केलें. कारण कापसाचा हंगाम सरला व उतारकरूही तिकडचे फारसे नसतात. एके दिवशीं एकच प्यासेंजर सर्व गाड्यांमिळून होता असें ऐकण्यांत आलें. हंगाम सुरू झाल्यावर पुन्हा आगगाड्या नाऊ येऊ लागतील.

मलकापुर स्टेशनापासून बुलढाण्यापर्यंत पक्कि सडक खात्याकडून सडकेची जमीन मारण्याचें काम चालले होतें तें पुरें झालें.

मि० आर बी पिट असिस्टंट सेटलमेंट आफिसर हे मोजणी खात्याचे आफिसिएटिंग डिपुटि सुपरइंटेंडंट झाले. व त्यांची जागा क्या० नी मेकंजी मोजणी कडील असि० सुप० यांस मिळाली.

[illegible]स इलाख्याकडील बंगलोर हेरल्ड पत्रा समजतें कीं हैदराबादचे रेसिडेंट मि० इर्स सी. बी. हे आजारी आहेत व ते रजा घेऊन विलायतेस जातील

उमरावती—ह्या आठवड्यांत म्हणण्या सारखा पाऊस पडला नाहीं. परंतु एक दोन सरी आल्यामुळें पिकाचे कामास बरें पडलें. कपाशीचा पेरा पुरा होऊन कित्येक ठिकाणीं चार बोटें पर्यंत कपास आली आहे. हवेंत गरमी फार आहे म्हणून पुष्कळ पाऊस लवकर पडण्याची आशा आहे. म्हणण्यासारखी रोगराई नाहीं.

मेहेरबान कमिशनर साहेब यवतमाळाहून परत आले.

जंगल खात्याच्या परिक्षेत एकंदर १७ उमेदवार होते त्यापैकीं चार इसम पसार झाले. ज्या लोकांची परिक्षा उतरली नाहीं त्यांस त्यांच्या नायाच्या परिक्षा उतरे पर्यंत भरपगार मिळणार नाहीं.

उमरावती येथील कित्येक सरकारी नोकर लोकांची लूट आहे व त्यामुळें रयतेचें फार नुकसान होतें अशा विषयीं रासिडेंटाकडे कोणी इसमानें अर्ज केला होता. तो चौकशी करितां तेथें आला आहे.

स. प्र.

## अकोला

असिस्टंट सर्जन एल सी मानी यांस डा. पोर्टर साहेबाचे जागीं अकोल्यास आफिशिएटिंग सिविल सर्जन नेमिलें व तुरुंगाचाही अधिकार त्याजकडे दिला अशाविषयीं हिंदुस्थान सरकारचा जाहिरनामा गेल्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झाला आहे.

११ वे तारखेच्या मुंबईच्या ग्याझेट पत्रांत डा. सिंक्लेर साहेब यपीक डायरेक्टर नागपुरास मि. ब्राडनिंग साहेबांचे जागेवर जाणार अशी वऱ्हाडांत बातमी असल्याविषयीं लिहिलें आहे, परंतु तो मजकुर निराधार आहे. व नागपुरास डालमाट साहेबांची नेमणूक झाल्याचे गेल्या आठवड्यात प्रसिद्ध झालें आहेच.

रेलवे रेसिडेंट इंजिनियर आफिसाकडे राजश्री बळवंत गोविंद करंदीकर हेडड्राफसमन ( नकाशे काढणारे ) होते त्यांस तुमच्या चाकरीची गरज सरली असें वरिष्ठांनीं कळविलें व त्यांस इतक्यांत धारवाडाकडे पाब्लिक वर्क्स खात्यांत चाकरीही मिळत आहे असें ऐकिलें. हे गृहस्थ सात्विक, निरुपद्रवी व मोठे कर्मठ आहेत. यांस रिकामे राहवें न लागतां लवकर जागा मीळण्याचें संधान आलें या बद्दल आम्हांस संतोष वाटतो.

स्टेशनाजवळ रयतेच्या बागेत लोकांस जाण्यायेण्याची मोकळीक झाली हें मागें आम्हीं कळविलेंच आहे. हल्लीं आणखीं असें समजतें कीं तेथें या मजकूराचा एक फळा करून लाविला आहे. व त्यांत वेळा लिहिल्या आहेत.

### मागाहून आलेली नोटिस.

नोटिस—देवलिंग गुरु येकुआया व पंच्याक्षरी आया व हरीआपा गळेले व होनापा डोंगरे वस्ती बाळापूर यांस लाकीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते ऐशीजे तुम्ही आम्हांस एक वर्षापासून वाहिवाटतांवरले मानिता व ह्या तुमचे असें रीतीचें मानिल्यानी इतरही जातवाले त्या प्रमाणें मजशीं वर्तन ठेवितात. परंतु ममवर दोष कोणता आहे हें तुम्ही किंवा

दुसरेही जातवाले सांगत नाहींत करितां या अशा कृत्यामुळें माझें फार नुकसान आहे सबब तुम्हांस हो नोटिस देण्यांत येते कीं आज पासून १९ दिवसांत तुम्हीं मजवर कोणता दोष ठेउन मजला बहिष्कृत ठरविता तो दोष चार लोका समक्ष माझे मागीं लावावा. जर सदरील मुदतीत तुम्हीं लीहिले प्रमाणे दोषारोपंण मजवर न ठरवाल तर तुम्हांवर शिरी प्रमाणे अब्रुचे नुकसानी बाबद व इतर नुकसानी बाबद दावा केला जाईल तारीख ११ जुलै सन १८७०

(सही) तुकापा बकद माहाद्वापा दलाल बंबनकर दस्तुर खुद

## वर्तमानसार

मागें वर्तमान निघालें होतें कीं महाराणी साहिबांचे वडील पुत्र प्रिन्स आफ वेल्स हे हिंदुस्थानांत येणार, त्यास आतां आणखी तुजोऱ्याचें वर्तमान असें आलें आहे कीं ते राजपुत्र सन १८७० चे डिसेंबर महिन्यांत येणार आहेत. हिंदुस्थानावर राजवराण्यांतील माणसें अशीं आपली पायधूळ झाडूं लागलीं हें त्याचें भाग्य होय, असें मनांत येऊन संतोष होतो इतक्यांत अशा स्वाऱ्या येण्यानें हेशावर जो खर्चाचा बोजा पडून याची साल निघते ती मनांत येऊन दुःख वाटतें.

लुधियाणा एयून फिलोर एथें जाण्याकरितां एका लष्कराचें वऱ्हाड सतलज नदींतून नावेंत बसून जात होतें ती नाव पुलाचे कमानीचे खांबावर आपटून फुटली व ६० माणसें तिजमध्यें नसेंलकीं बुडून मेलीं. घोडें व बैल घेऊन दोन पोहोणारे जात होते तेवढे मात्र जिवंत राहिले. अरेरे! केवढा अनर्थ हा!

मुंबईस विहारचे पाण्याचे नळ लोकास दिले आहेत याबद्दलच्या कराचें उत्पन्न या वर्षांचें ३८०००० रुपये होईल असा अजमास आहे. यासाठीं वर्षांचा नेमणुकी खर्च ७१००० रुपये आहे व सरकारचे कर्जाच्या हप्त्याबद्दल दर साल १७९००० रुपये द्यावे लागत असतात.

मुंबईच्या पोस्टाकडील एक क्लार्क निबनराम धनेश्वर हा पत्रें फोडून घरीं नेत असे. संशयावरून त्याचा झाडा घेतला तों ३९२ पत्रें टिकिटांसाहित मिळालीं, व फाडून टाकिलेल्या हजारो पत्रांचा सुगावा पडला. सेशनांत त्यावर शाबिती होऊन त्यास पांच वर्षें सक्त मजुरीनिशी कैदेची शिक्षा झाली.

कर्नल कीटिंग नागपुरचे नवे चीफ कमिशनर ९ वे तारखेस येऊन आपले कामावर रुजु झाले. व मि० मारिस साहेब रजेवर गेले.

पोलिटिकल किंवा परगण्याकडील पेनशनाचा पैसा दोन वर्षेंपर्यंत कोणी घेतला नाहीं तर पुढें इलाख्याच्या सरकारच्या स्पेशिपल परमाणगीवाचून त्यास देऊनये असा हिं. सर. नें ठराव केला आहे.

जंजिरा संस्थानांत गडबड होती त्याकरितां मि० हावलाक साहेब रिविन्यु कमिशनर तिकडे गेले होते ते परत आले. की जेपैकीं १०० लोक यांनीं अजून तेथेंच ठेविले आहेत.

सुपारी वरील जकात दर हंड्रेडवेटास ७ रुपये होती ती ४ रुपये झाली आहे. तशीच केरोशाइन वगैरे तेलावरील जकातही कमी झाली आहे.

चीन देशांत मोठी गडबड होऊन फ्रेंच धर्मोपदेशकांस वदुसरे युरोपियनांस ठार मारले व यांचें देऊळ जाळिलें असें वर्तमान आहे.

रेलवेचें उत्पन्न—या सालच्या पहिल्या तिमाहींत हिंदुस्थानांतील सर्व रेलवे कंपन्यांस जें उत्पन्न झालें तें गुदस्त सालांतील तितक्याच मुदतीच्या उत्पन्नापेक्षा ७,६०,००० रुपयांनीं कमी आहे. या सालीं दर आठवड्यांत दर मैलास सरासरी २९६ रुपये मिळाले, व गुदस्त सालीं ३०६ रुपये मिळाले होते. जी आय पी रेलवेला गुदस्त सालीं सरासरी ४४० रुपये मिळाले होते व यासालीं ३६९ रुपये मिळाले. ईस्ट इंडिया रेलवेचे उत्पन्नाची वाढ झाली. तिला गुदस्तां ४८२ रुपये मिळाले होते व यंदा ४८८ रुपये मिळाले. हल्लीं हिंदुस्थानांत सर्व रेलवे कंपन्यांत हिचा नंबर पहिला, व जी आय पी चा दुसरा आहे. तिसरी बडोदा रेलवे, हिला या वर्षीं दर आठवड्यास दर मैलास ३९१ रुपये मिळाले, ईस्टर्न बेंगाल रेलवेचें उत्पन्न गुदस्त सालीं २९२ रुपये होते व या सालीं २८९ रुपये झाले.

ठक, उनाड, भटकत फिरणारे, लबाड अशा लोकांनीं चांगल्या वर्तणुकीचा जामीन दावा व न देतील तर माजिस्त्रेटानें यांस सक्त मजुरीनिशी कैदेची शिक्षा द्यावी अशा मजकुराचें एक नवीन कलम नव्या क्रिमिनल प्रोसिजरचे कायद्यांत सामिल करावें अशाविषयीं आनरबल मि० स्टिफेन साहेब यांनीं हिंदुस्थान सरकारचे कायदे कौसलांत सूचना केली आहे. वायव्य प्रांतांत अशा लोकांस जामीन न मिळतील तर साध्या कैदेची शिक्षा देण्याचा नियम आहे, व यामुळें मजुरी न करितां सरकारचे पदरीं दुवक्ता भोजन करुन तुंद पडलेले पुष्कळ आळशी लोकांनीं तिकडील तुरुंग भरुन गेले आहेत सबब स्टिफेन साहेबांची सूचना मान्य होईल तर फार चांगलें होईल,

मि० आनुस्टी साहेब मुंबईचे नामांकित बारिस्टर कलकत्यास आपला धंदा चालविण्याकरितां जाणार आहेत.

बाबू केशव चंद्रसेन हे एडिंबरोमध्यें जाऊन व्याख्यानें देणार आहेत असें कळतें.

शंकराचार्य स्वामीची स्वारी तिसरे तारखेस संकेश्वरास जाऊन सुरक्षित पोंचली

बाटाघाटीवरुन असें उघडकीस आलें आहे कीं सालमजकूरच्या अफीमेत सरकारास तोटा नसून उलटें तीस लक्ष रुपये शिलकेंत राहत आहेत. ही गोष्ट खरी ठरेल तर सरकारच्या कामदारांची धन्य आहे. असो आतां तरी नव्या सहामाहीपासून हा जबर इनकमटयाक्स बंद करितील तर बरें होईल.

कपुरथळ्याचे व पत्याळचे राजे साहेब विलायतेस जाणार आहेत.

पुणें एथें थोडे दिवसांत लावण्यांच्या चालीवर भजन करणारे एक साधू आले आहेत. त्यांचे भजनाची रुची तेथील लोकांत चांगली लागल्यामुळें पुष्कळ लोकांच्या घरोघरींही त्यांचीं भजनें होऊं लागलीं आहेत. यांचे भजनांत व तमाशांत इतकेंच अंतर आहे कीं तेथें पोऱ्या असतो व एथें बोवा असतात, तेथें लावण्या असतात व एथें अभंग गातात पण तमाशाच्या चालीवर. भजन इतकें प्रेमळ व सुरस होत असतें कीं त्याला भुलून अनेक लोक त्यांचे नादीं लागले आहेत. लोक तर काय पण मोठे मोठे गुणी व विद्वान हे देखील त्यांचे भजनीं लागले आहेत मग अन्यांची काय कथा!

सालमजकूरचे आषाढी एकादशीस पंढरपूर येथें भजमासे दोन लाख यात्रा जमली असून महर्गताही विशेष आहे. गव्हांचे दर शेरभर पिठास पांच आणे पडत, असें ऐकिवांत आलें आहे. ज्ञा. च.

नगर—या आठवड्यांत पर्जन्य दान च्यार दिवस चांगला. पडला आतां पेरणीचे कामास हरकत नाहीं. हवेचे मानही बरें आहे. वृ. वै.

हिपरगें— येथील तलावास पाणी दररोज चढत आहे. एकंदर पाणी तेवीस फुट जमलें आहे, आतां मात्र एकदम पाणी चढण्याचा संभव आहे ओढ्यास माहापूर जरी आला तरी सांठवणीचा पसार सुमारें दाहाबारा मैल झाल्यानें फुट अर्धा फुट पाणी चढतें. क. त.

शिंदे सरकारचे राज्यांत गुदस्त सालीं दुष्काळ पडला होता तेव्हां पाच महिन्यांत ९२९८९ मनुष्यें व ४००० गुरें मरण पावलीं. एकंदर ६३७३ खेड्यांपैकीं २८३८ खेड्यांवर दुष्काळाचा अंमल होता. त्यामुळें दहा लक्ष वसूल थकला व मागून बंडापासुन ओढत आलेली बारा लक्षांची सूट द्यावी लागली. व जकातीचे कामीं आठ लक्षांची नुकसानी झाली. सरकारानें इमारती व सडका बांधण्याकडे ८९६८७१ रुपये खर्च केले. ९२००० रुपयांची लोकांनीं मदत दिली. व ग्वाल्हेरचे सराफ आणि व्यापारी यांनीं गरीब लोकांस अन्न पुरविलें. ने. ओ.

सोलापूर—ता० ७ व ८ रोजीं पर्जन्य चांगला झाला. तळ्यांत पाणी पूर्वींचें असोन हल्लींही भरपूर आलें आहे यांत ता० ७ रोजीं रात्रीं सात वाजल्या पासून प्रातःकाल साडा वाजे तोंपर्यंत सारखा पर्जन्य पडला. असा पाऊस फार दिवसांत झाला नाहीं. गरमी अद्याप पुष्कळ आहे यावरुन आणखीं पर्जन्य पडण्याचें चिन्ह दिसत आहे. क. त.

धुळें—या आठवड्यांत पर्जन्यानें उघाडी दिली आहे. ता० २ रोजीं थोडी सर आली होती. आतांशीं आकाश ढगानें आच्छादित असून पर्जन्य पडेलसा भास होतो परंतु मेघराजाचे मनांत येत नाहीं वारा मात्र वाहतो पर्जन्य पडेल तर बरें होईल अशी सर्वतोमुखीं बोलवा आहे. या शहरांत ताप खोकल्याचा आजार जारी असून मनुष्यास वायु होणें हा प्रकारही ज्यारी आहे. महागाई पूर्ववत आहे. कपाशीचा भाव उतरल्यामुळें व्यापारी लोकांचीं तोंडें सुकून गेलीं आहेत. त्रा. वै.

नाशिक—या आठवड्यांत म्हणण्यासारखा पाऊस पडला नाहीं. आकाश नेहमीं अभ्रांनीं आच्छादित असतें. दिवसें दिवस गर्मीचें मान वाढतें आहे. बुधवारीं सायंकाळपासून गुरुवारीं दोनप्रहर पर्यंत मात्र आंग भिजण्या सारखा तुषार पडत होता.

येथील शहर फौजदार (चीफ कान्स्टेबल) शेख अमीर यांजवर आलेले आरोपांची चौकशी होऊन सेशन कमीट झाले असें समजतें. ना. वृ.

कान्स्टन्टिनोपल येथें भयंकर आग.—विलायतेंतील पत्रांवरुन कळतें कीं, तारीख ५ जूनच्या दिवशीं कान्स्टान्टिनोपल येथें भयंकर आग लागला होता. या आगीच्या योगानें तेथील इंग्लिश, पोर्टुगीज, व अमेरिकन वकीलांचे वाडे व बसाहतींचीं घरें जळून फस्त झालीं. शहरांत ही मोठीच नुकसानी झाली. नाटक गृहें देवळें, मशीदी, दुकानें व घरें पुष्कळ जळून जमीनदोस्त झालीं. ही आग दोन प्रहरीं १ वाजल्यापासून मध्यरात्रपर्यंत सुरु असून वारा अतिशय सुटला होता. एकंदर घरें ७९०० जळालीं व पाच कोट रुपयांचें नुकसान झालें असें कळतें. मनुष्येंही पुष्कळ मेल्याचें समजतें. मि. द.

सातारा —हवा मागील आठवड्याप्रमाणेंच आहे. पर्जन्याची गरज फार आहे. आजार कमी होत चालला आहे.

कलेक्टर साहेब बहादुर यांणीं लायब्ररी साठीं मुंबईहून (क्लास्टर नावाचा) दिवा आणऊन तो बक्षीस करण्या करित १०० रु० कमेटीकडे पाठवून दिले.

एथील हेड आकौंट हपीसांतील रा० रा० गोविंदराव कठापुरकर यांस नाशिक येथें हेड क्लार्काची जागा मिळणार आहे

रा० रा० महादाजी मोरेश्वर मामलेदार यांस पेनशन घेण्याविषयीं हुकूम झाला पण मुंबईचे डाक्टराचें सरटिफिकीट पाहिजे.

ठराव. सरकारानें असा ठराव केला कीं, दर एक जिल्ह्यांनिहाय असणारे एग्झिक्युटिव इंजिनीयर यांस आजपर्यंत ९ रुपये शेकडा देऊन म्युनिसिपाल कमिटीचें काम करावें असा ठराव केला होता. तो आता ७८८ देण्याविषयीं हुकूम झाला आहे सरकारानें होईल तितकी इंजिनियरची भर करावी. म. म.

चीन आण्याबद्दल सरकारावर फिर्याद:— पुणें जिल्ह्यांत तळेगांव कोर्टांत एक मनुष्यास एक आण्याचा स्टांप कागद पाहिजे होता. तो वेंडर याजपाशीं नव्हता सबब त्यास गरज होती आणें ८४ चा स्टांप घेऊन आपलें काम चालू केलें आणि ८३ नुकसानी बद्दल वेंडर याजवर नुकसानीची फिर्याद तळेगांव कोर्टांत केली. वेंडर याणें जबाब दिला कीं, मामलेदार तालुके शिरुर याणीं कागद पुरविले नाहींत, तेव्हां मामलेदारास कोर्टानें प्रतिवादींत स

गांळ केलें. मामलेदार यांचा जबाब. हुजूर खाजिनदार यांणीं कागद पाठविले नाहींत. तेव्हां शेवट मेहेरबान कलेक्टर साहेब बाहादुर यांस प्रतिवादींत सामील करून तो मोकदमा पुणें अदालतींत येऊन असिस्टंट जज्ज कोडतांत हें काम सुरू झाल्याचें समजतें. तीन आणे नुकसानीची ही फिर्याद सरकारावर आहे.

धान्य-- बसोरा, बुशायर, मसकत व परशियाचे अखातचे बंदरांतून कराची एथे गहू, तांदुळ, व मूग यांचीं तारवें भरून आलीं आहेत; तीं वरील प्रदेशीं जेथें धान्याची महर्गता आहे तेथें पाठविणार आहेत.

नवे सनदी नोकर-- नेक नामदार साहेब हे मौलवी अबदुल लतीफ, बाबू श्रीनाथ घोष, बंकिमचंदर चतरजी, तारकनाथ घोष व इश्वर चंद्रामित्र यांस नवीन झालेले आकटाप्रमाणें सिव्हिल सर्व्हिसच्या जागा देणार आहेत अशी आफवा आहे.

ने. बो.

## जाहिराती.

**नोटिस**—नानकराम संतुकराम साहू दुकान खामगांम यांचीं खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येते कीं तुमची मजकडेस खातेबाकी घेणें आहे आणि देण्यास मी राजी आहे पण हिशेबांत तुमचें माझें अंतर पडतें म्हणने तुमचे हिशेबी तुम्हीं जें घेणें मजकडे आहे म्हणून म्हणता तितकी रक्कम माझे हिशेबी मला तुमची देणें निघत नाहीं सबब तुम्हांस नोटिस दिली आहे तर आजपासून १५ दिवसांत तुम्हीं चार लोकांसमक्ष हिशेबाचा मुकाबला माझे रुजवातीनें करून जी बाकी मजकडे निघेल ती घ्यावी तसें न करतां फिर्याद कराल तर मी फिर्यादीचे खर्चास जबाबदार होणार नाहीं कारण कीं रास्त बाकी निघेल ती देण्यास कबूल आहे कळावें तारीख १४ माहे जुलई सन १८७० इसवी.

(सही) मनवरखा वल्लद लालखा दस्तुर खुद.

### महामारीवर औषध.

मी खालीं सही करणार सर्व लोकांस मोठ्या खात्रीनें जाहिर करतों कीं, कालरा ज्यास पटकी, मरखा, गोळी, अथवा महामारी असें म्हणतात; त्यावर मी १५ वर्षांपासून औषध देत आलों आहे. माझ्या औषधानें शेकडा ८० मनुष्यें या महादुष्ट काळाच्या दाढेंतून वांचतात. हें औषध फार उपयोगाचें व इतर औषधांपेक्षां सदरहू रोगावर विशेष गुणाकारी आहे. हें पाहून माझ्या मित्रांचे सांगण्यावरून याच्या मी डब्या तयार करून ठेवल्या आहेत. प्रत्येक डबींत ५ रोग्यांस पुरेल इतक्या औषधाच्या गोळ्या आहेत व डबी सभोंवतीं औषध देण्याचा प्रकार व पथ्यापथ्याविषयीं कागद गुंडाळलेला आहे. एके डबीस ३॥ तीन रुपये दहा आणे किंमत पडेल. या शिवाय टपाल हशील पडणार नाहीं. ज्यास हें घेणें असेल त्यानें सदरहु डबीचे रोख रुपये अथवा टपालच्या टिकिटा बरतावळ्यासहित खालीं सही करणार याकडे अथवा रा. रा. गंगाधर सिताराम हेडमास्तर इंग्लिश मराठी स्कूल पेठ देऊळगांवराजा याकडेस पाठविल्या असता सदरहु डबी टपालांतून त्यास तात्काळ पाठविली जाईल. या डबीचा सर्वत्रांनीं संग्रह केला असतां महामारीची त्यांस भीति राहाणार नाहीं.

(सही) गोविंदासा दस्तुर शंकर मारतंड वैद्य राकीन पेठ देऊळ गांवराजा तालुके चिखली जिल्हा बुलढाणे

## नोटिस.

खालीं सही करणार यांचे चिरंजीवाची चेहरेपट्टी खालते लिहिली आहे. ते बहुधा वऱ्हाड प्रांतांत असतील असा पूर्ण संभव आहे. सबब आज रोजीं इन्स्पेक्टर जनरल पोलिस प्रांत वऱ्हाड यांजकडे अलाहिदा अर्ज केल्याप्रमाणें जो कोणी आमचे चिरंजिवाचा पत्ता लाऊन देईल अथवा त्याचे हातचें आल्यास पत्र रवाना करील त्यास आम्ही १०० शंभर रुपये सुर्ती इनाम देऊं तारीख १५ माहे जून सन १८७० इ

(सही) वामनराव जयवंत जाहागिरदार मौजे यावली वगैरे ता० बार्शी जि० पुणें मुक्काम हैदराबाद दक्षण दस्तुर खुद.

गोविंद वामनराव जाहागिरदार मौजे यावली वगैरे ता० बार्शी यांची चेहरेपट्टी.

| नांव. | उमरवर्षे | ओळखूं येण्याच्या खुणा. | भाषापरिज्ञान. |
|---|---|---|---|
| गोविंद वामनराव जाहागिरदार मौजे यावली. | १७।१८ | रंग गोरा तोंडावर देवीचे वण उंची मध्यम अंगानें सडपातळ उजवे हाताची करंगळी किंचित मोठी मिशा आल्या नाहींत. | १ मराठी. १ कानडी १ तेलंगी. १ मुसलमानी. |

सदरहू गृहस्थ तारीख ८ माहे मे सन १८७० इसवी रोजीं दिवसा बारावर तीन वाजतां गेले आहेत ता. १५ जून १८७०

वामनराव जयवंत यांजकडोन.

### फौजदारी काम चालविण्याविषयीं कायदा सटीक.

हें नव्या क्रिमिनल प्रोसिजर (सन १८६१ च्या ८ वे) कायद्याचें मोठें पुस्तक टीकेसुद्धां व त्यावरील हायकोर्टाच्या सर्क्युलरें, ठराव, व इतर ग्रंथकारांचे अभिप्राय यांसुद्धां रा. रा. नारायण बाळकृष्ण चितळे उर्फ रावजी भाजेकर ठाण्याचे वकील यांनीं तयार करून ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें, त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक संग्रह करण्या लायक आहे. याची किंमत ७ रुपये व डाक हशील ७ आणे पडतें

## जाहिर खबर.

देण्यांत येते कीं, चालू फौजदारी कायदे व आक्टांचे सर्व संग्रहाचें बुक छापण्याचें काम सुरू आहे; या पुस्तकांत कोण कोणते विषय छापले जातील, व पुस्तक घेणारांस किंमत काय पडेल याबद्दल वगैरे तपशीलवार कलमें लिहितों:—

१. या पुस्तकांत सन १८२७ पासून सन १८७० पर्यंत (ज्या तारखेस बुक तयार होईल त्या तारखेपर्यंत) कायदे आक्ट अनुक्रमानें सालवार छापले जातील.

२. सदहुं कायदे व आक्ट पुरे झाल्यावर शेवटीं ज्या ज्या कलमावर इंटरप्रिटेशनें व हायकोर्टाचीं सरक्युलरें आणि निवाडे उपयोगी पडण्यासारखे आहेत ते सारांशानें छापण्यांत येतील.

३. हें पुस्तक टाइपावर छापण्याचें कांम चालविलें आहे. आणि पहिल्यापेक्षां विशेष सुधारणाही केली आहे याकरिता या पुस्तकाची किंमत आगाऊ या जाहिरातीचे तारखेपासून ता० ३१ जुलई सन १८७० इसवीचे आंत पाठविणारांस दर प्रतीस रुपये ५॥ व टपाल खर्च रुपया १ एकूण रुपये ६॥ पडतील. सदहू मुदतीनंतर पुस्तक घेणारांकरितां दर प्रतीस ८ पासून १० रुपये पर्यंत किंमत ठेविली जाईल.

४. सदरहू पुस्तकें तारीख १७ अक्टोबर सन १८७० इ० चे सुमारास तयार होऊन लोकांस मिळतील.

५. आगाऊ किमतीचा पैसा पाठविणें तो हुंडी अगर रिमिटेन्स अथवा पोस्टाच्या टिकिटा दर रुपयास येक आणा प्रमाणें कमिशन सुद्धां पाठवाव्या. आमचें राहण्याचा पत्ता मुंबई येथें कांदेवाडींत केशवजी नाईक यांचे चाळींत याप्रमाणें पत्ता लिहून लखोटेचे आमकडे पाठवावे.

सदरीं पांच कलमीं मजकूर लिहल्या वरून कळेल.

तारीख २ माहे जून सन १८७० इसवी.

नारायण मोरेश्वर केळकर
मुक्काम मुंबई

तानाकलम दिवाणीप्रकर्णी कायदे व आक्टांचे बूक सन १८६८ अखेर पर्यंत पुणें येथें राघवेंद्र रावजी मांडे वकील यांणीं वामन राव केशव भट वकील यांचे मदतीनें तयार केलें त्याची किंमत दर प्रतीस रु० ७ व टपाल खर्च ०।२ आहे आणि तारीख ५ माहे मे सन १८७० इसवी पर्यंतचे कायदे व आक्टांचें बूक दिवाणी प्रकरणीं, मुंबई, मद्रास, कलकत्ता हाय कोर्टांचे निवाड्या सहित विष्णु मोरेश्वर केळकर वकील हाय कोर्ट यांणीं छापलें आहे याची किंमत रु० १२ व टपाल खर्च रु० १।४ आहे. सदहूं वर सन १८४७ चे २० वे आक्टाप्रमाणें मालकी आमची असून यांनीं छापली होती यांच्याकडे मागणें केल्यावरून यांणीं बुकें आमच्या स्वाधीन केलीं व पुन्हा छापणार नाहीं म्हणोन स्टांपावर करारनामेही लिहून दिले. तर सदहूं बुकें शिल्लक आहेत ज्यास घेणें असतील त्यांणीं वर लिहिल्या प्रमाणें किंमत पाठवावी म्हणजे पाठविण्यांत येतील.

फौजदारी प्रकर्णी बुकाची जाहिरात तारीख २३ मेचे इंदुप्रकाशांत न्याशनल छापखान्याचे मालक या सहीची प्रसिद्ध झाली आहे तें बुक तयार झाल्यावर पाहून जर आमचे हक्कास बाध येत असेल तर कोर्टाची मदत घेऊन जरूर करणें लें जाईल याजकरितां त्या बुकास सही देणारे लोकांनीं आपले फायद्याचा विचार करून सही द्यावी.

ना. मो. के.

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं ज्ञा० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्रीस आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ०३ आणे.

| किमतीचे ठराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षाची आगाऊ देणारास… | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची आगाऊ … … | १ | ८ |
| एक अंकास | | ५ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५१ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व साल अखेर १ रु० ८ आणे.

आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारासही त्याचा मागील हिशेब सारून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्याची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत … … … १ रुपया.

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०१

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०।

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास, दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसाचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास अडीच वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं

वऱ्हाडसमाचाराचे मालक

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं आजपर्यंतची व मागील गुदरून गेलेल्या वर्षाची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धा आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता. १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यात मालकाकरितां छा. मु. केळें

# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. 5 AKOLA :—SATURDAY EVENING— JULY, 23 1870 NO 30

पुस्तक ५ अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २३ माहे जुलै सन १८७० इ०. अंक३०


## लढाई.

हा सदरचा शब्द पाहिला म्हणजे वाचकांस दुसरे मजकूर एकीकडे ठेवून एतद्विषयीं वाचण्याची अधिक हौस येते. व आवेशी आणि वीर पुरुषांच्या तर मनोवृत्ती इतक्या चंचळ होतात कीं आतां लढाई होणार, लढाई होणार, असा त्यांचा नित्य घोष चालून ते आनंदानें वेडे होतात, पण त्या लढायीच्या स्थलावरील स्थितीची हुबेहुब तसबीर मनांत आणिली व तिच्या परिणामा विषयीं विच्यार केला तर दयालु व कोमलांत: करणी मनुष्याचे नेत्रास अश्रु आल्यावाचून कधीं राहत नाहींत. लढायीविषयीं कल्पनाच बऱ्या व इतिहासांतून आणि पुराणांतून त्या वाचावयास चांगल्या होते. लढाई आतां अशा सुधारणेच्या काळांत प्रत्यक्ष घडणें चांगलें नाहीं. देशांत धरणें बांधून पाट चालविलेले पहावयाचे ठिकाणीं रक्ताचे लोट चाललेले कोण पाहील! घरोघरीं बिंदेचा व्यासंग ऐकूं येण्याचे ऐवजीं लढाईत बाप, काका, मामा, नवरा मूल कोणीना कोणी ठार झाल्यामुळें दु:ख व आक्रोश नित्य चाललेला कोणी ऐकावा! ज्ञानाच्या व यांत्रिक शोधाच्या वृद्धीपासून जें सुख भागोवयाचें त्याचे बदला मोठमोठे नवीन कराचे बोजे व लोकोपयोगी कार्याचा संक्षेप कोणी सहन करावा? आणि हे सर्व लढाईचे परिणाम आहेत ह्मणून कृपाळु ईश्वरानें ती होऊ देऊ नये हें फार चांगलें आहे.

शौर्यशाली राजांस आपले बलाचा गर्व असतो, व नाना प्रकारच्या उलाढाली व लढाया करून पृथ्वीवर आपण अधिक प्रसिद्धीस यावें अशी इच्छा असते; कित्येक राष्ट्रें आपण होऊन आगळीक करित नाहींत परंतु त्यांस दुसऱ्याची टोचणी किंवा अपमान अगदीं आवडत नाहीं ह्मणून त्यांस दुसरा राजा त्रास देऊं लागल्यास लढाईचें अगत्य पडतें. वर्षेच्या वर्षें लाखो सैन्य पडल्या ठिकाणीं मुडदारा सारखे पोसले जात असतें यास चांचल्य यावें व त्यांच्या शस्त्राचा गंज झाडवा हौंडी लढाईत एक योजना असते, व शूर आणि जिवावर उदार अशा पुरुषांचे करामतीस फाव मिळावा अशासाठीं ही लढाई राष्ट्रांत पाहिजे असें कोणाकोणाचें मत आहे परंतु तिचे परिणाम सुखस्वरूप होण्यापेक्षां दु:खजनक फार होतात हें मनांत आणिलें म्हणजे तसें मत राहूं नये हें रास्त आहे. असो, प्रस्तावनेंतच वेळ व पत्राची जागा फार गेली ह्मणून आतां ती आवरून मुख्य गोष्ट सांगूं.

भूगोलाच्या माहितो वरून युरोप खंडांत फ्रान्स व प्रशिया या नावाचे दोन देश आहेत ते वाचकांस ठाऊक असतीलच. त्या दोन राष्ट्रांमध्यें प्रस्तुत लढाईचा प्रसंग उपस्थित झाला आहे. त्याचें कारण आम्हीं थोडक्यांत सांगतों तें असें.

युरोपांतच स्पेन म्हणून एक देश आहे तेथें इसाबेला या नावाची राणी राज्य करित असे. तिनें लोकांवर जुलुम केले व अंदाधुंदी चालविली, आणि प्रधानाचें व तिचें जमेना म्हणून लोकांनीं तिला राज्यावरून काढून टाकिलें ती फ्रान्स देशांत जाऊन राहिली आहे. स्पेनच्या लोकांनीं आपले देशाचें राज्य कांहीं काळ आपणच चालविलें पण आपले शिरावर कोणी राजा असेल तर चांगलें असें त्यांस वाटून त्यांनीं कित्येक राजघराण्यांतील पुरुषांस राजा होण्याविषयीं पत्रें पाठविलीं परंतु कोणी कबुल करीना, शेवटीं प्रशियाच्या राजाचा पुत्र होहेनझोलर्न जर्मनींतील कांहीं संस्थानाचा मालक यानें स्पेनचा राजा होण्याचें कबूल केलें. राज्यसुख कोण विचारा नको म्हणेल? परंतु युरोपांत फ्रान्सदेशाचा शिपायीबाणा प्रसिद्ध असून त्याचा घालबली स्वभाव व वरचढपणाही सर्व राष्ट्रांस ठाऊक आहे. स्पेनची राणी फ्रान्सदेशांत जाऊन राहिलेली आहे, व फ्रान्सचा कांहीं राष्ट्रांवर डोळा आहे तेव्हां अशा गडबडींत स्पेनचें राज्य पतकरून आपला जीव कोण धोक्यांत घालतो? म्हणून राज्यसुखासारखें उत्तम वैभवही कोणी राजघराण्यांनीं कबूल केलें नाहीं. परंतु प्रशियाविषयीं पाहिलें तर ह्या देशानें नुकतीच अस्त्रियादेशाशीं लढायी करून जय मिळविला आहे व आस्त्रियास त्यावेळीं फ्रान्स अनुकूल होता हें प्रसिद्धच आहे त्यावरून त्यानें म्हणजे प्रशिया देशाच्या राजाच्या पुत्रानें फ्रान्सचें फारसें भय न धरितां स्पेनची गादी कबूल करितों असें पत्र लिहिलें तेव्हां तें फ्रान्सास न आवडून त्यानें प्रशियाचे राजास त्याविषयीं लिहून विचारिलें. राजानें पोक्त विचार करून व रक्तपातादि घोर दु:खास भिऊन आपले पुत्राकरवी स्पेनची गादी नाकारविली व तसें फ्रेंचास कळविलें. वास्तविक म्हटलें, म्हणजे प्रशियानें यावेळीं हें मोठें शहाणपण केलें यांत संशय नाहीं. पण फ्रान्स तेवढ्यानें संतुष्ट झाला नाहीं त्यानें प्रशियास आणखी असें कळविलें कीं, तुमचा दुसरा कोणी पुत्र अगर जर्मनींतील संस्थानिक स्पेनची गादी कबूल करणार नाहीं असें तुम्हीं लिहून द्यावें. या निरोपाचा प्रशियाचे राजास राग आला व त्यानें फ्रेंचाचे वकिलास स्पष्ट सांगितलें कीं, तुमचें आमचें भाषण वर्ज आहे व तुम्ही याउपर आमचे भेटीस येऊं नये. हें वर्तमान फ्रान्सचे बादशहास कळतांच त्यानें प्रशियाशीं लढायी करावयाची असा निश्चय प्रसिद्ध केला.

आतां दोन्ही बाजूनें लढाईची सिद्धता झाली आहे. फ्रान्सचा लढायीचा निश्चय झाला तोंच प्रशियानें त्याचे राज्यांत चालून जाऊन एक गाव वळकाविलें व लगझंबर्ग एथें रेल्वे होती तिचा विध्वंस केला पाच लाख फौज रणांगणीं आणण्याची योजना केली. प्रशियाचे फौजेंत निडल गन म्हणून एक प्रकारची बंदुक आहे तिचे एका मिनिटांत आठ दहा बार काढितां येतात ती उत्कृष्ठ युक्तीची बंदूक फ्रेंचाकडे नाहीं, शिवाय प्रशियास रशियानें लढाईस मदत देण्याचें कबूल केलें आहे. बवेरिया नांवाचें संस्थान प्रशियाचे मदतीस येत आहे. व आणखींही कांहीं राजे मदतीस येतील.

फ्रान्सचे बादशहास तर लढायीची मोठीच हौस, त्यानें सेनापतित्व स्वतां पतकरिलें आहे. व बरोबर पुत्रास घेऊन राजधानी सोडून निघाला आहे. या आठवड्यांत त्याची साडेतीन लक्ष फौज जमून हातूवर चाल करून जाणार होती, त्याचा रोख जर्मन संस्थानांवर आहे. त्यानेंही पांच लक्ष फौज युद्धास सिद्ध ठेवण्याची योजना केली आहे व लजिस्लेचर आरंभाचे खर्चाकरितां दोन कोटि रुपयांची यादि दिली आहे. आस्त्रिया फ्रान्सास मिळेल व दुसरेही कांहीं राजे त्यास मिळतील असें म्हणतात. लढाईची शुरवात आगष्टच्या आरंभास होईल.

डच सरकार आपली फौज जमा करित आहे, त्याचा रोख अजून कळला नाहीं. डेन्मार्क, इटली, हालंड, व बेलजम एथील राजांनीं दोन्ही पक्षास मदत न करितां अलग राहण्याचा निश्चय केला आहे.

विलायतेचे तारायंत्रांतून बातम्या तर आतांशी सकाळ, दुपार, सायंकाळ येत आहेत. १९,२०,२१, ह्या तारखेचीं वर्तमानें आहेत कीं इंग्लिश सरकारानें दोन्ही बाजूस न मिळतां अलग राहणार असें प्रसिद्ध केलें आहे. व लढाईचीं जहाजें आपल्या बंदरांतून जाऊं नयेत अशा विषयीं एक कायद्याचा मसुदाही ते करीत आहेत. इंग्लिश सरकारचा दृढ निश्चय दिसतो कीं अगदीं न्यायाची व केवळ तिऱ्हाइतपणाची वागणूक या प्रसंगीं ठेवावयाची. लढायी न होण्याकारितां मध्यस्थी करण्याचा इंग्लिश सरकारानें आपला बेत फ्रान्स सरकारास कळविला होता परंतु त्यांनीं आम्हास जरूर नाहीं असें कळविलें.

प्रशियाच्या अभिषिक्त राजपुत्रास जर्मन दक्षिण भागच्या फौजेचें सेनापति केलें. प्रशियन लोकांनीं ऱ्हैन नदीवरील केहल जवळचा पूल पाडून टाकिला.

फ्रेंच बादशहानें आपली कंटिनेंट फौज आणखी १४०००० वाढविली व खजिनाहीं अक्रम खुला केला.

हा लंडनच्या किनाऱ्या वरून तोफांचा मारा २० वे तारखेस ऐकूं येत होता.

साक्सनी आणि हेसि हीं संस्थानें प्रशियाकडे मिळालीं.

या प्रमाणें तूर्त तारायंत्रांतून आलेल्या खबरा आहेत. पुढें हातघाईचा प्रसंग कधीं व कसा येतो किंवा सला होतो तें पहावें. प्रस्तुत युरोप खंडांत स्वस्थता नाहीं- व लढाई प्रकरणाशिवाय सर्व प्रकारच्या व्यवहारांस थोडी बहुत हरकत आली असें म्हटलें पाहिजे.

## ब्राह्मणांच्या स्त्रिया.

आमच्या या अफाट हिंदुस्थान देशांत किती प्रकारच्या चाली व रिती आहेत त्या समजत नाहींत. व एकेक नवीन दृष्टीस पडली ह्मणजे आश्चर्य वाटतें. तिसरे पृष्ठावर बंगालच्या कुलीन ब्राम्हणाची गोष्ट लिहिली आहे ती पाहवी. आजच्या काळांत एका ब्राह्मणानें पन्नास बायका कराव्या व तो मेला ह्मणजे तितक्या विधवा व्हाव्या, व पुनर्विवाहाचे बंदीची इच्छा धरावी म्हणजे काय जुलूम आहे! एक ब्राह्मण शेंकडो बिचाऱ्या गाई ब्रम्हाच्या दावणीनें बांधितो आणि त्यांस पोटास मागण्याचाही कांहीं हक्क नाहीं म्हणतो हा कसा कसाबी कावा आहे पाहिलात का! बायका म्हणजे परसांतली भाजी, पाहिजे तेव्हां पाहिजे तितकी खुडावी व मनास वाटेल तर कामीं लावावी नाहीं तर उकिरड्यावर फेकावी हाच न्याय झाला. अरेरे! ज्या स्त्रियांचें गुण, रूप, लावण्य, विद्या, कौशल्य यांच्या द्वारें त्यांची योग्यता प्रगट होऊन पुरुषांनीं त्यांस शोधित जावें तें उलटें झालें आहे. पहा, मोत्याकरितां जीवावर उदार होऊन लोक समुद्रांत बुड्या मारतात, तसेंच दूर दूर देशीं सुवर्णाच्या व रत्नांच्या खाणीचा शोध लावण्याकरितां पुरुष जातात, आणि हीं आमचीं स्त्रीरत्नें अंत बऱ्यानें हुंडा देऊन किंवा फुकट तरी कोणी न्या म्हणून आई बापानीं शोधित फिरावें असा प्रसंग आमच्या ब्राम्हण लोकांवर शास्त्र शास्त्र म्हणून घोकित बसल्यानें आला आहे व याचा कोणी विच्यार करित नाहीं. कुलीन ब्राम्हणानें पन्नास बायका करून माहेरीं ठेवाव्या व कधीं वर्ष दोन वर्षांनीं मर्जीस आलें तर त्यांतून एकादी कडेस एकादेवेळ जावें, नाहीं तर नाहीं. अशानें या अबलांकडून नीतीचें संरक्षण कसें होत असेल कोण जाणे! आग लागो असल्या प्रवृत्तीला! अशा गोष्टी वारंवार उघडीस येऊन त्या लोकांतून पुष्कळांची फटफजिती झाली तर ही प्रवृत्ती लयास जाईल. पुष्कळ बायका करून त्यांस यथेच्छ विरह द्यावें व त्यांच्या पोटास न देण्याचे सबबेनें तुरुंगांत जावें त्यापेक्षां ब्रह्मचर्यांत मरावें हें कीर्तिकारक होय व ईश्वराकडेस ही श्रेयस्कर होईल असें आम्हांस वाटतें, ।

### लगडें तर लंगडें आणि गांवखोरी चरेना.

ज्ञानप्रकाशकर्ते महाराज.—

बि० बि० कसें काय आहे? ठीक आहे ना! तुमची तर आतांशा मोठी कठीण दशा असेल नाहीं, हो असेल म्हणून काय विचारावें. करायच्या वेळेस बरें गोड लागतें आणि मग फळें भोगण्यास कां वाईट वाटतें. अहो पत्रकर्ते महाराज तुम्ही तर आलीकडे नसा ताळच सोडला आहे. तुमच्यांत सभ्यपणा म्हणून बिलकूल राहिला नाहीं. नाहीं तर पहा तुमचे बंधु नेटिव ओपिनियनचे कर्ते, कसे प्रतिष्ठित, सभ्य आहेत. त्यांनीं पाहिलें कीं, ह्या पुनर्विवाह संबंधानें कांहीं बोलले तरी कोणत्या एका पक्षास वाईट वाटणारच तेव्हां त्यांनीं आपले मुग गिळले. यांचें नांव प्रतिष्ठितपणा, सभ्यपणा. नाहीं तर तुम्ही, मुक्तीचें नंबर दोनचें द्वार, सकळ वेदशास्त्रकलासंपन्न जे राजमान्य राजश्री आप्पासाहेब नातू त्यांलाही वेदशास्त्र शून्य म्हणता. जळो तुमचे शब्द. त्या मराठी भाषेला कि हो विटाळतात. अहाहा! कळली अक्कल! कोणाला वेदशास्त्र शून्य म्हणोन माहित तरी आहे? तुम्हांस मराठी भाषा तरी येते? मला वाटतें तुम्ही "ढ" च आहां, कारण इतकी सोपी गोष्ट कशी तुम्हास कळत नहीं! बरें असो अहो तुम्हास जातीनें कांहीं कळत नाहीं तर नाहीं पण तुमचे "सभ्य" बंधूस "एक हिंदु" ह्या सहीचें पत्र लिहिणारा जो सभ्य आहे त्याचें तरी ऐका. तो म्हणतो "जो गृहस्थ मजला वेद येतो किंवा मजला शास्त्र येतें असा मुळींच नाणा बाळगीत नाहीं व ज्यास वेदशास्त्रसंपन्न कोणीच म्हणत नाहीं त्यास वेदशास्त्रशून्य म्हणण्यांत काय अर्थ आहे? होय खरेंच अशास वेदशास्त्रशून्य म्हणण्यांत काय अर्थ आहे? ज्यास वेद येतो, शास्त्र येतें त्यास म्हटलें तर असो. मोरशास्त्री बोवा, त्रिंबकशास्त्री बोवा ह्यांस एकपरी वेदशास्त्र शून्य ही पदवी साजेल. त्यांस ती पदवी देण्यांत अर्थ आहे पण आप्पाबोवांस तसें म्हणण्यांत काय जीव आहे? आमचा "एक हिंदु" जर कोणास वेदशास्त्र शून्य म्हणेल तर मोरशास्त्री बोवा सारख्यांसच म्हणेल, कारण त्यांत अर्थ आहे. ठीकच कोणास जर भिकारी म्हणणें झालें तर जो उघड भीक मागतो त्यास तसें म्हणण्यांत काय पुरुषार्थ आहे. जो कोट्याधीश आहे त्यास म्हटलें तर असो. इतकी सोपी गोष्ट तुम्हास कशी हो कळली नाहीं? ज्ञानप्रकाशकर्ते सभ्यपणाची चाल म्हटली म्हणजे अशीच आहे कीं ज्यास गातां येत नाहीं त्यास गातां येत नाहीं असें म्हणूं नये इतकेच नव्हे तर तो तानसेनाहूनही ज्यादा गवय्या आहे असें म्हणावें; कारण तशाला गातां येत नाहीं म्हणण्यांत काय अर्थ आहे. अमक्याला गातां येत नाहीं असें जर म्हणायाचें झालें तर एक तानसेनास मात्र म्हणावें. हा सभ्यपणा तुम्हास कोठें येतो! ज्याला वेद येत नाहीं, शास्त्र येत नाहीं त्यास तुम्ही वेदशास्त्र शून्य म्हणणार. धन्य तुमच्या ज्ञानाची.

बरें तुमचा स्वभाव तरी चांगला आहे? तेंही नाहीं. तुमचा दुष्टपणा तरी किती अवर्णनीय आहे! तो आप्पाराया बिचारा "कांहीं ब्रम्हसभेमध्यें विशेष पुढारी" होता व स्वामींस "ब्रम्हवृंदाच्या कामांत मदत करीत होता" ह्यामध्यें त्यास वेदशास्त्रशून्य म्हणण्याचा कायहो प्रसंग. जर कदाचित अमुक प्रदेशांतून रेलवेचा रस्ता नेला तर फायदा होईल अगर नाहीं असा विचार करण्याकरितां सभा भरली असती, अगर इन्कमटाक्साचा विचार करण्याची सभा भरली असती आणि त्यांत जर आप्पाराया "विशेष पुढारी" असते तर त्यांस वेदशास्त्र शून्य म्हणण्याचा प्रसंग आला असता, पण ब्राम्हण्याच्या वादांत वेदांचें अगर शास्त्राचें काय करावयाचें आहे. खरेंच ज्ञानप्रकाशकर्ते तुमचें व न्यायशास्त्राचें सर्वथैव वाकडें दिसतें. कितीहो तुम्ही वेडे आहा, अहो खाण्या जेवण्याच्या, अगर व्याजबट्याच्या कामांत शास्त्रज्ञता अवश्य पाहिजे आणि त्यामध्यें शास्त्रसंपन्न कोण व शास्त्रशून्य कोण ह्याचा विचार प्रासंगिक व अवश्य होय, पण ब्रम्हसभांमध्यें विशेष पुढारी होण्यास शास्त्रज्ञता कशास पाहिजे? अशा सभांमध्ये तर शास्त्रज्ञता हा उलटा दोष आहे आणि हें माझें अज्ञानाचें, वेदशास्त्रशून्याचें म्हणणें नव्हे, तर "सभ्य" नेटिव ओपिनियनास पत्र लिहिणारे जे सभ्य व वेदशास्त्र संपन्न "एक हिंदु,, ह्यांचेंही मत असेंच आहे. ते म्हणतात "ग्रामण्याच्या सभेंत शास्त्र्यांपेक्षां गृहस्थांची जरूर विशेष पडते. अमुक वर्तन शास्त्राविरुद्ध आहे किंवा नाहीं हें सांगण्याचें मात्र काम शास्त्र्यांचें, परंतु तसें वर्तन अमुक गृहस्थानें केलें किंवा नाहीं हें ठरविण्याचें काम गृहस्थांचें आहे. "हें "एक हिंदूचें" वचन तुम्ही शिरसा मान्य करावें हें योग्य आहे; कारण तो पारमार्थिक सुखाचे नंबर दोनचे द्वाराचा रक्षक पडला. तसाच तो जातीनें सभ्य व सभ्य वर्तमानपत्राचा भक्तही आहे. तसेंच त्याचें म्हणणेंही सर्वांशीं सयुक्तिक आहे. पहा कीं "गृहस्थ" हा शब्द साधारणतः जो शास्त्री अगर वैदिक नाहीं अशासच लावतात. एकंदर ब्राम्हणांचे दोन भाग भिक्षुक अगर शास्त्री आणि बाकीचे गृहस्थ असे करतात. सारांश गृहस्थ ह्या शब्दाचा अर्थ शास्त्रशून्य इतकाच आहे म्हणजे "गृहस्थ" ह्या शब्दाचा अर्थ वेदशास्त्रज्ञतेचा अभाव ज्याचे आंगीं आहे तो. हा मराठी भाषेंत साधारणतः ह्या शब्दाचा अर्थ दिसतो व ह्याच अर्थी "एक हिंदु" ह्यानेंही ह्याचा प्रयोग केला आहे. आतां हा त्या शब्दाचा अर्थ धरिला म्हणजे "एक हिंदु" चें जें मीं वर वाक्य उतरून घेतलें आहे त्याचा अर्थ असा होतो कीं, अमुक वर्तन शास्त्रविरुद्ध आहे अगर नाहीं हें सांगण्यास शास्त्रज्ञतेची आवश्यकता आहे पण अमुक्यानें तसें वर्तन केलें आहे अगर नाहीं हें सांगण्यास शास्त्राचें अज्ञान हा विशेष गुण आहे. हें समजण्यास शास्त्र येण्यापेक्षां न येणें चांगलें. ठीकच आहे. अमुक गृहस्थानें अमुक कृत्य केलें किंवा नाहीं हें नेहमी साक्षी पुराव्यावरून कळतें. तेव्हां ज्या शास्त्रांत साक्षी पुरावा कसा असावा, कोणाची साक्ष घ्यावी, कशा रीतीनें घ्यावी, कोणाच्या साक्षीवर किती वजन ठेवावें हें सांगितलेलें आहे, असें जें धर्मशास्त्र त्याचा अमुक गृहस्थानें अमुक कृत्य केलें किंवा नाहीं हें ठरविण्यांत कांहीं उपयोग नाहीं स्पष्टच आहे. ह्याचा निर्णय करण्यास प्रमाणशास्त्राचें सांकडें पाहिजे. पाहा कीं, एकादा राग अमुक तऱ्हेनें गायला असतां तो शुद्ध अगर अशुद्ध हें सांगण्याचें काम मात्र गवयाचें आहे, परंतु तो राग अमुक मनुष्यानें शुद्ध रीतीनें गायला किंवा नाहीं हें समजण्यास गाणें येणें हें प्रतिकूळ आहे. अमुक रोग झाला असतां अमुक औषध देणें वैद्यशास्त्रसंमत अगर वैद्यशास्त्रविरुद्ध आहे हें सांगण्याचें काम वैद्याचें आहे पण अमुकास रोग झाला आहे अगर नाहीं हे समजण्यास वैद्य नसेल तर बरा. अमुक प्रकारचा प्रयोग असला म्हणजे अमुक रूपाच्या क्रियापदाचा प्रयोग करणें व्याकरणशास्त्रसंमत अगर तद्विरुद्ध आहे हें सांगण्यास वय्याकरण पाहिजे पण अमुक मनुष्यानें शुद्ध प्रयोग केला अगर नाहीं ह्याचा निर्णय करण्यास व्याकरण न आलें तर चांगलें. ह्या प्रकारचीं अनेक उदाहरणें सांपडतील. इतकें सयुक्तिक "एक हिंदूचें" म्हणणें आहे तेव्हां तुम्हीं तें शिरसा मान्य करावें हा तुमचा धर्म आहे आणि न कराल तर पाहा आपला विचार. तुमच्या पक्षांत रा० शांतारामासारखे अगर मि० आन्स्टीसारखे अप्रयोजक वकील आहेत पण तिकडे ठाऊक नाहीं म्हटलें एक एक "सुज्ञ" अतिरथी महारथी पडले आहेत. मि० आटाकिन्सनें साहेब, व मि० नानाभाई हरिदास, मि० विश्वनाथ नारायण मंडलिकासारखे आहेत. तेव्हां "एक हिंदु" च्या सल्ल्यानें वागाल तर त्यांत तुमचें कल्याण आहे. असो ही माझी "हिंदू" च्या पत्रांतील पहिल्या कलमांतील मजकुराविषयीं सल्ला झाली. परंतु ह्याच कलमाचे शेवटीं एक असें वाक्य आहे कीं, "आलीकडे मद्यपान फार वाढ आहे तें कमी करण्याकरितां कित्येक गहस्थ झटतात तर वस्तुतः त्याबद्दल त्यांची स्तुतीच केली पाहिजे" ह्याचा अर्थ काय हें मला अज्ञानाला समजत नाहीं. माझ्या दृष्टीनें ह्या वाक्याचा पत्रांतील बाकीच्या कोणत्याही वाक्याशीं संबंध दिसत नाहीं. त्याचा प्रसंग काय व हें कोणास अनुलक्षून लिहिलें हें समजत नाहीं. जसें लिहिणाराचे मनांत हें वाक्य कसें तरी घुसडून द्यावेंसें होतें त्याप्रमाणें त्यानें कसें तरी घुसडून दिलें असें तें दिसतें. बरें इतकेंही करून त्यांतील गोष्ट तरी खरी आहे, तर तेंही नाहीं. ह्या देशांत मद्याचीं दुकानें अनेक होत चाललीं आहेत व दर रोज इंग्रजी शिकून हिंदुधर्मावर गैर भरंवसा ठेवणारे लोक अधिक होत चालले आहेत पण ह्या गोष्टी बंद करण्यास कोणी ह्या इलाक्यांत झटतात हें मला ठाऊक नाहीं. ह्याकरितां "झटताहेत "म्हणजे काय करताहेत हें जर "एक हिंदु" सांगता तर बरें होतें आणि हा खरोखरी परोपकाराचा प्रयत्न कोण करताहेत हें जर समजेल तर त्यांची स्तुती पहिल्यानें मी करीन पण असे झटणारे मला माहित नाहींत. मला इतकें मात्र माहित आहे कीं, आम्ही मद्यपान बंद करण्यास झटतों असें नुसते तोंडानें म्हणणारे पुण्यांत व मुंबईंत व दुसऱ्या शहरोशहरीं पुष्कळ आहेत, परंतु त्यांतील कित्येक स्वतः सेवन करणारे व त्याहीपेक्षां कन्यागमन, विधवागमन, शूद्रीगमन, यवनीगमन, कांच खाणें वगैरे दुष्ट अघोर पातकें करणारे व तुरुंग पाहून आलेले आहेत. ते आपल्या दोषांवर पांघरूण घालण्या करितां दुसऱ्याच्या व्यर्थ कुटाळ्या करतात. भिंतीस जर डोळे, कान, जिव्हा असती तर कित्येक देवघरांत भस्माच्या व अग्निहोत्राच्या अगारांत यथायथ आवाज कशाचे होतात हें त्या सांगत्या. पण असे ढोंगी लोक आमच्या पुण्यामध्यें कोणी आहेत असें मला वाटत नाहीं.

असो" एक हिंदूनें "दुसरें असेंही म्हटलें आहे कीं, आप्पासाहेबांस वेदशास्त्र शून्य जर म्हणावें तर पुनर्विवाह पूर्णपणें सशास्त्र आहे असें ज्यानीं आलीकडे सरक्युलर काढलें आहे त्यासही कां म्हणूं नये? खरेंच पत्रकर्ते महाराज "एक हिंदूचें" म्हणणें सर्वांशीं बरोबर दिसतें. आप्पासाहेबांस जरी शास्त्र येत नसेल तरी त्यांच्या वडलांस येत आहे तेव्हां त्यांस कांहीं तरी अधिकार आहे पण ह्या सम्मतिपत्रवाल्यांस हो काय आहे. तुम्ही कदाचित् म्हणाल कीं सर्व वाद मराठींत झाला, साधक व बाधक सर्व प्रमाणें एका ठिकाणीं छापलीं गेलीं, सर्व वचनांचे अर्थही मराठींत लिहिले गेले "नष्टे मृते" सारखीं कांहीं वचनें तर आबाल वृद्धांस माहित झालीं, आहेत, तशींच अनेकदां ह्या विषयावर मराठींत व्याख्यानें दोनही पक्षाकडून दिलीं, तात्पर्य आज वर्षभर पर्यंत ह्या विषयाचा मराठी भाषेंत इतका ऊहापोह झाला आहे कीं, ज्याच्या बुद्धीवर कोणतीही विद्या, शिकल्यानें कांहीं संस्कार म्हणून झाला आहे त्यास मत देण्यास हिंदु शास्त्रज्ञतेचीच मोठी गरज आहे असें नाहीं. असें तुम्ही कदाचित म्हणत असाल. तसेंच तुमचें दुसरें असेंही म्हणणें असेल कीं, आपण आपल्या वर्तणुकीविषयीं कोणताही नियम केला तरी फारशी चिंता नाहीं, परंतु दुसऱ्याच्याबद्दल करण्याच्या वेळीं मात्र आपली वळकटी अधिक पाहिजे म्हणजे माझें मत अमुक आहे हें सांगणें ही एक व तुझें मत माझ्यासारखें असलें पाहिजे, नसेल तर तूं शिक्षेस अगर बहिष्कारास पात्र होशील असें म्हणणें अगर तसें करण्यास झटणें ही दुसरी. ह्या दोन गोष्टी फारच निराळ्या आहेत, असें ही तुम्ही कदाचित म्हणत असाल पण तें सर्व खोटें आहे. आप्पाबोवांस वेदशास्त्र शून्य म्हणणें योग्य होय असें सांगणारी जी तुमची बुद्धी ती भ्रष्ट होय. ती लवकर सोडून द्या आणि ते आपल्या पारमार्थिक सुखास झटताहेत असे जे आप्पाराया त्यांचें" जय आप्पाराया, जयजय आप्पाराया ह्याप्रमाणें भजन करा. ह्यांतच तुमचें कल्याण आहे. मुक्तीचें दार उघडें आहे. शिरामात्र झणजे झालें. मग तुमचे विमानाचा पाय धरून मी स्वर्गवासी थोरल्या " श्री " कडे येईन. कळावें हे विनंती.

नंबर दोनच्या द्वाराचा,
भक्त.

## कमिशनर साहेबांचे ठराव.

आमचे पश्चिम वऱ्हाडचे कमिशनर मे० लायल साहेब यांनीं या आठवड्यांत आम्हांकडे आपले दोन ठराव पाठविले आहेत ते आम्ही आपले वाचणारांकरितां प्रसिध्द करितो.

फैसल नामा

स्पेशल आपिल नंबर ७ सन १८७०

फैल तारीख १४ माहे एप्रिल सन १८७० इ० विद्यमान कमिशनर साहेब बहादुर प्रांत पश्चमवऱ्हाड.

स्पेशल अपिलेंट } रामचंद्रकृष्णराव देश
रिस्पोंडेंट वादी } पांडे परगणे बाळापुर तालुके मनकुर जिल्हा आकोलें.

वकील अमृतराव आबाजी.

स्पेशल रिस्पोंडेंट } शामराव गोविंद देश
अपिलेंट प्रतिवादि } पांडे परगणें बाळापुर तालुके मनकूर जिल्हा अकोलें.

वकील हरिराव विनायक.

दावा मौजे शेळद येथील पाटीलकीचे हक्काबद्दल रुपये १४१८१४

शेळद येथील पाटिलकीचे हक्क आणि हकीयत यांजवर आपला हक्क शाबीद कर्ण्या करितां वादीनें फिर्याद केली आहे. कोणत्याही प्रकारच्या मालमिळकतींतील हिशा करितां किंवा कामाकरितां किंवा वतनाचे उत्पन्नांतील हिशाकरितां वादी दावा करित नाहीं, परंतु आपण पाटिल असोन काम मिळण्यास पात्र आहो असा ठराव मिळण्याकरितां तो दावा करितो.

अवल कोर्टानें वादीवतीनें फैसल केला.

कनिष्ठ अपिल कोर्टानें तो दावा रद्द केला त्यास आधार हा लाविला कीं पंचवीस वर्षांपर्यंत प्रतिवादीचा कबजा होता असें वादीनें कबूल केलें आहे यास्तव वादीचे दाव्यास मुदतीची हरकत आहे.

अपिलामध्यें अपिलेंटाची तक्रार ही आहे कीं प्रतिवादीचा कबजा आपल्यावती आपले गुमास्त्यादाखल होता. रिस्पोंडेंटाची तक्रार ही कीं सन १८५९ इसवीचा आक्ट १४ कलम १ रकम १३ अन्वयें या फिर्यादीस मुदतीतीची हरकत आहे कारण घराण्याचे एकत्र मिळकतींतील हिशाकारितां केलेले फिर्यादीस सदरील रकमे अन्वयें जी मुदत आहे ती सदरील मिळकत ज्याचे कबजांत आहे त्यानें दिलेल्या अंगेर रकमेच्या तारखेपासून सुरु होते. मुंबईचे हायकोर्टाचे ठरावाचा दाखला दिलेला आहे, यांत स्पष्ट लिहिलें आहे कीं लेखी दस्तऐवजावर सही करुन वतनाचे हिशाचा हक्क कबूल केला असतां सन १८५९ इसवीचे १४ वे आक्टाचे कलम १ रकम १३ यांत सांगितलेली मुदत अशा प्रकारें सुरु होत नाहीं कीं ज्या मनुष्याचे वतीं ती कबुलायत झाली तो मनुष्य आपला दावा चालवूं शकेल.

जर हल्लींच्या फिर्यादींत पाटलाच्या घराण्यांतील आपण म्हणोन कांहीं विशेष मालमिळकतीचा हिसा घेण्यास आपला हक्क आहे म्हणोन वादी फिर्याद करितो तर मुदतीचे कारणानें त्या फिर्यादीस हरकत आली असती. याविषयीं कांहीं संशय नाहीं; परंतु ह्या प्रकर्णांत आम्हीं असें समजतों कीं वादीची फक्त इच्छा हीच आहे कीं आपली हकीयत कबूल होऊन तिन विषयीं ठराव केला जावा आणि आपल्या घराण्यांतील दुसऱ्या मनुष्यास बारा वर्षांहून ज्यास्त काल काम करुं दिलें आणि वसूल घेऊं दिलें एवढ्या कारणावरुन पाटलांचे घराण्यांतील एखादे मनुष्यास आपले वतनाचे संबंधानें काढून टाकतां येत नाहीं व त्या वतनाचे योगानें प्राप्त झालेले वंशपरंपरेचे विशेष हक्कापासोन त्यास दूर करितां येत नाहीं असें आम्ही मानितों. कारण असें लिहितां येईल कीं पुष्कळ प्रकर्णांत जो पाटील काम करितो त्यासच उत्पन्न मिळत असतें. हक्काचे हुकुमनाम्या बद्दलचे फिर्यादीस तेरावें कलम लाविलें असतां पाटलाचे घराण्यांतील ज्या मनुष्यास कांहीं रुसुमाचा हिसा किंवा मिळकतींतील हिसा बारा वर्षे पर्यंत मिळाला नाहीं त्याजला पाटीलकीचे घराण्यांतील आपण आहों असा हक्क शाबीत करितां येत नाहीं असें मानिलें असतां या देशांत सांप्रत जी वहिवाट चालली आहे तिजमध्यें मोठाच फेरफार सुरु केल्यासारिखें होईल.

कनिष्ट अपिल कोर्टानीं ठराव केला कीं, या फिर्यादीस मुदतीची हरकत आहे तो ठराव आम्ही रद्द करितो वादी हा प्रथमारंभीं पाटलाचे घराण्यांतील मनुष्य होता असेविषयीं अगदीं संशय नाहीं परंतु ज्याअर्थीं हा मुद्दा घडलेल्या गोष्टीविषयीं आहे त्याअर्थीं मुकदम्याचें स्वरुपावरुन अपिलेंट याजला हक्काचा हुकुमनामा मिळावा किंवा नाहीं ह्याचा निर्णय करण्याकरितां हा मुकदमा परत पाठविला आहे तारीख २७ माहे जुलई सन १८७० इ.

---

फौजदारी

सेशन मुकदमा नंबर १० सन १८७० इ.

विद्यमान ए. सी. लायल साहेब बहादूर कमिशनर प्रांत पश्चमवऱ्हाड यांचे कोर्टांत दाखल तारीख १३ माहे जुलै सन १८७० इ,

कैदी.

रामचंद्र वल्लद गोविंदराव राहणार माहूर इलाखा मोंगलाई.

च्यार्ज.

इं. पि. कोडचें कलम ३०७ प्रमाणें खुनाचा प्रयत्न करणें.

ठराव तारीख १ जुलै सन १८७० इ.

या मुकदम्यांतील गोष्टी निःसंशय शाबित झाल्या असें मानिलें पाहिजे. आपणावर कैदीनें एकाएकी येऊन हल्ला केला याचें स्पष्ट वर्णन हबसन साहेबानें दिलें आहे. जर ह्याची जबानी भरवशा लायक नाहीं असा संशय धरिला तर सत्य सोडून भलता मजकूर सांगण्याचा ह्याचा कांहीं हेतु होता असें नाहीं आणि जो मजकूर आपले विरुद्ध सांगितला गेला आहे ह्याचा इनकार कैदी करित नाहीं. कैदीचा बच्याव हा आहे कीं, त्या वेळेस माझे मन बराबर नव्हतें यास्तव आम्हीं असा निर्णय करितों कीं कैदीनें एकाएकी मेहेरबान हबसन साहेब यांचे आंगावर जाऊन एका लांब तीक्ष्ण रुंद पात्याचे कट्यारीनें त्याचे छातीवर इतक्या जोरानें भोसकलें कीं तेणें करुन साहेब व कैदी दोघेही जमिनीवर पडले. दैवेंकरुन शरीर चुकून कट्यार सैल कपड्यांत शिरली परंतु जर कट्यार शरिरांत शिरती तर बहुत करुन निश्चयात्मकपणें मृत्युदायक झाली असती, हा खुनाचा स्पष्ट यत्न आहे. आपण काय करितों ह्याचें स्वरुप आणि परिणाम कैदीस समजला नाहीं असा तर्क उत्पन्न करण्यास कांहींच आधार नाहीं. कैदीचा काय हेतु होता हें समजू सकत नाहीं परंतु त्याजला दोषी ठरविण्यापूर्वीं त्याचे मनांतील खरा काय हेतु होता हें शोधून काढणें आपणास अवश्य नाहीं. कैदी अज्ञान, धर्मवेडा असोन सीमेची हद्द मोजण्याविषयीं त्यास राग येऊन किंवा अविचारानें भय प्राप्त झालें असेल, असें जरी मानिलें तरी ह्या गोष्टीवरुन त्याचा बच्याव शिक्षेपासून होत नाहीं परंतु हें अगदीं शक्य आहे कीं त्याचा कांहीं तरी दुसरा हेतु असावा ज्या हेतूचा आपणास थांग लागला नाहीं.

शिक्षा

कोर्टाचा अभिप्राय असेसरांपैकीं एकाचे अभिप्रायास मिळत असून तें ठराव करितें कीं, रामचंद्र वल्लद गोविंदराव यानें च्यार्जांत सांगितलेला खुनाचा प्रयत्न करण्याचा गुन्हा केला आणि तसें करुन हिंदुस्थानाचे अपराधास शिक्षा करण्याविषयीं कायद्यांतील कलम ३०७ यांत ज्या गुन्ह्यास शिक्षा सांगितली आहे त्याचा तो गुन्हेगार आहे आणि कोर्ट हुकूम देतें कीं, सदरील रामचंद्रानें दाहा वर्षांची सक्त कैद भोगावी. तारीख १ जुलै १८७०

## वर्तमानसार

शाहजादा नेपोलियन. या नावाचा फ्रान्स देशाच्या बादशहाचा चुलतभाऊ हा थोडक्या मुदती नंतर हिंदुस्थानांतील फ्रेंच वस्त्यांनी पाहावयास येणार आहे.

पुनर्विवाह—रा० रा० माहादेव गोविंद रानडे यांनीं मेंगल सराई नेटिव्ह लिटररी सोसैटीस पत्र लिहून विचारिलें कीं आपली मंडळी उंच जातींच्या विधवांमध्यें पुनर्विवाहाचा प्रकार सुरु होण्यास उत्तेजन देण्याकरितां एक समाज करुं शकेल कीं नाहीं आणि विधवा विवाहास अनुकूल असे अभिप्राय काशींतील मुख्य पंडितांकडून आणवून पाठवूं शकेल कीं नाहीं? त्यावरुन पुष्कळ वादविवाद होऊन मुंबई येथील विधवा विवाहोत्तेजक मंडळीचे नियम आणून पाहाण्या विषयींचा ठराव झाला असें अलीगढ इ० ग्याझेटवरुन कळतें.

कोल्हापुरचे महाराज:—गेल्या शुक्रवारीं आगबोट आली, तिजवरुन असें आनंदकारक वर्तमान आलें आहे कीं, कोल्हापूरकर महाराज हे आक्सफोर्ड युनिवर्सिटीचा वार्षिक समारंभ पाहाण्यास गेले होते, तेथें विद्यार्थ्यांनीं त्यास चांगला सन्मान दिला. ने. ओ.

मे० ओग्डन सा० कलेक्टरचे कामावर ता० २० रोजीं मुंबईस जाणार होते.

श्रीधर विठ्ठलदाते नशिराबादचे मामलेदार, व नारायण रामचंद्र ओव्हरसियर जिल्हा खानदेश या दोघांस जो कोणी पकडून देईल त्यास, दाते याजबदल १००० रु० ओव्हरसियरा बदल रु० ५०० इनाम देण्याचा ठराव होऊन गावोगाव जाहिराती लागल्या आहेत.

ना. वृ.

मंगलोर ब्राह्म मिशन—हिंदुस्थानांतील ब्राह्म समाजाचे दोघे उपदेशक मंगलोरास गेले आहेत, तेथें त्यांच्या उद्योगास बरेंच फळ येत आहे. तेथील बिलावर लोकां पैकीं १७ असामी ब्राह्म पंथानुयायी झाले आहेत व पुढें आणखी पुष्कळ होतील अशीं चिन्हें आहेत. त्याप्रमाणेंच तेथील सारस्वत ब्राह्मण लोकांनीं तेथें प्रार्थनासमाज स्थापन केला व पुढें थोड्या दिवसांनींच त्या समाजास त्यांणीं ब्रह्मसमाज असें नांव दिलें असें कळतें. या ब्राह्मपंथाचो मुख्य तत्वें एक निराकार ईश्वर मानून त्यास भजणें व सर्व पृथ्वींतील लोक आपले भाऊ व बहिणी याप्रमाणें मानून त्यांजवर सारखी प्रीति करणें हीं आहेत.

कुलीन ब्राम्हण—बंगाल्यांत कुलीन ब्राम्हणांत एका पुरुषास पन्नास साठपर्यंत बायका असण्याची चाल आहे. ह्या बायकांच्या पालन पोषणाचें ओझें नवऱ्यावर पडत नाहीं. त्या जन्मभर आपल्या माहेरीं राहतात. तेथें नवरा वर्षांतून एकादे वेळेस फेरी करितो तेव्हां बायकोची भेट होते. अशा नवऱ्याबायकांची परस्पर ओळखही नसते. अशा चालीच्या वाईट परिणामाचें वर्णन करावयास नलगे. अलीकडेस एका कुलीन ब्राम्हणाच्या सहा बायकांतून एकीनें आपल्या नवऱ्याकडून आपल्या पोटास देववावें म्हणून माजिस्ट्रेटाकडेस फिर्याद केली यावरुन नवऱ्यानें तीस दरमहा १६ रुपये द्यावे असा हुकूम केला. तथापि तो नवरा तिच्या पोटास देईना. तेव्हां कलकत्याच्या हाय कोर्टातून वारंट काढून त्यास धरुन कोर्टांत आणलें. त्या समयीं त्याणें जजास असें सांगितलें कीं नवऱ्यानें बायकोचें पोषण करण्याची चाल आमच्या जातींत नाहीं, म्हणून मी हिच्या पोटास देत नाहीं, परंतु जजानें त्यास असें सांगितलें कीं आम्ही तुमच्या जातीची चाल बिल कांहीं जाणत नाहीं, कायद्या प्रमाणें तुमच्या बायकोच्या पोटास तुम्हास दिलें पाहिजे, त द्या, नाहींतर तुम्हास तुरंगांत पाठवूं. शेवटीं त्यास खरोखर तुरुंगांत पाठवून दिलें. अशा ठरावांनीं या अतिनिंद्य व अधर्मकारक चालीस कांहांतरी प्रतिबंध होईल असा संभव आहे.

सरकारी फीमेल नार्मल स्कूल—या नार्मल स्कूलाविषयीं कांहीं बरोबर हकीकत कधीं कळत नाहीं; परंतु टैम्समध्यें एक पत्र छापिलें आहे त्याजवरुन त्या शाळेंतील स्त्रीविद्यार्थ्यांकडून करारनामा लिहून घेण्याचा विचार विद्याखात्याचे डिरेक्टर यांणीं चालविला आहे. त्या विद्यार्थ्यास दरमहा पंधरा रुपये देणार आणि, त्यांजपासून असें लिहून घेणार कीं आम्ही हा हल्लींचा पंधरा रुपये पगार घेतल्याबद्दल आम्ही शिक्षक होण्यास लायक ठरल्यावर तीन वर्षे पंधरा रुपये अगर अधिक दाम त्या पगारावर चाकरी करुं व जर तसें न करुं अगर चाकरिवर असतां गैर रीतीनें वागूं तर सर्व घेतलेला सरकारचा पैसा परत देऊं. याचा परिणाम कसा होईल कोण जाणे.

हिं. रि.

धुळें—आठ पंधरा दिवसांत मुळींच पर्जन्य नव्हता. ता १३ मिनहूरोजी संध्याकाळ पासून चांगला पडला. येणें करुन कपा

सोंच विकांस गुणावह होऊन शेतकरी लोकांची उमेद ताजी झाली व ते या कामीं झटूं लागले. मेघराजानें आपलें पूर्ण भरत झार्चे अवडंबर घालून पुन्हा आम रोजीं वृष्टी सुरू केली आहे. महागाई आपलें स्वरूप पालटीत नाहीं. शहरांत वाघ ।। चा उपद्रव चट पट होत आहे. जनावरांस जंगलांत चरावयास सोडूं नये व आप आपले घरीं बांधून ठेवावीं असा हुकूम असल्यामुळें जनावरांचे फार हाल होत आहेत.

## वऱ्हाड.

मे० दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब असिस्टंट कमिशनर यांस खामगावाम स्वाल्काज कोर्टाचे आफिशियेटिंग जज्ज नेमिलें.

मे० बुशबी साहेब यवतमाळचे डिपुटि कमिशनर १७ वे तारखेस व मे० बेल साहेब उमरावतीचे डिपुटि कमिशनर १८ वे तारखेस आपआपलें जागीं रजेवरून येऊन दाखल झाले.

बुलढाण्याचे डिपुटि कमिशनर आफिसांतील शेंबेकी शिरस्तेदार कामावर नसल्यानें तूर्त तेथें उमरावतीचे जुडिशल शिरस्तेदार रा० रा० देशाव जयकृष्ण यांस पाठविण्याचा निश्चय झाला आहे. तेथें आतां जे खटले चालणार आहेत ते सरकार तर्फे चालविण्यास एथील वकील रा० अमृतराव आबाजी यांस नेलें आहे. व आरोपी लोकांनीं रा० रा० पांडुरंग गोविंद वकील यांस नेलें आहे असें समजतें.

खामगावास पर्जन्य पुष्कळ पडला असें खासगी पत्रावरून कळतें.

बाळापुरास दोन्ही नद्यांना पूर येऊन फारच नासाडी झाली. थोरली धर्मशाळा पडली व मि० विठंदखा कंट्राक्टर यांचें घर वगैरे पडून कित्येक हजारांचें नुकसान झालें असें ऐकतों—बाळापूर शहरच्या चीफ कान्स्टेबलानीं महादापा खंडापा याचे दुकानचो गुळाची वगैरे चोरी गोपाळदास व ह्याचे बंधु यांनीं केलेली उत्तम रितीनें पकडली याबद्दल ह्यांच्या स्तुतिपर एक पत्र आलेलें आहे.

वणीचे तहशिलदार रा. रा. भास्कर महेश्वर ह्यास कांहीं आरोपा वरून तूर्त यवतमाळास बोलाविलें आहे. स. प्र.

### अकोला

या आठवड्यांत पर्जन्यानें अतिशय संतोष व अतिशय दुःख दिलें. पाऊस चांगला पडला यामुळें संतोष व घरें शोकडो पडलीं यामुळें दुःख झालें. इतकीं घरें एके दिवशीं अशीं कित्येक वर्षांत कधीं पडलीं नव्हतीं. बहुत लोकांच्या घराच्या भिंती पडून फार नुकसान झालें. नदीला फार मोठा पूर आला होता व दोन दिवस उतार झाला नाहीं. नावेच्या नाल्यावरून पाणी गेलें. भीज पाऊस सारखा मंगळवारी दुपारीं च्यार वाजल्या पासून बुधवारचे रात्रींपर्यंत पडतच होता. व गुरुवारींही ह्याचे तुषार होते. एथें नाव आहे ती असून नसल्यासारखीच आहे. दिवसांतून तीनदा ती जलसमाधि घेते. एवढें बरें कीं छातीइतक्या पाण्याहून अधिक पाण्यांत ती चालवीतच नाहींत, नाहीं तर मनुष्याच्याही जलसमाधीस ती मोठी साधन झाली असती- लोकांपासून सरकार नावेचा कर घेतें आणि नाव व नावाडी चांगले राखित नाहीं ही बेदाद आहे. साहेब लोकांस नदी ओलांडण्याचा नित्याचा प्रसंग असत तर नावेची अशी वाईट स्थिति कधीं राहिली नसती. असें लोकांस वाटतें.

रा० श्रीकृष्ण मैराळ यांस इरिगेशनच्या म्हणजे धरणें व पाट बांधण्याच्या खात्याच्या इंजिनियरकडे क्लार्कची ४० रुपये पगाराची जागा मिळाली. हें आफिस इकडे प्रस्तुत नवें झालें आहे. श्रीकृष्ण हे एथील हायस्कुलांतील विद्यार्थी असून फारेस्टकडे उमरावतीस नुकतीच जी परीक्षा झाली तींत पास झालेले आहेत.

## जाहिराती.

नोटिस—महादू वलद गटु वाहाकर रहाणार मौजे निमकवळे तालुके मलकापूर यास नोटिस देणार जानकी मर्द महादू रहाणार खामगांव नोटिस देते कीं तूं माझा लग्नाचा नवरा आहेस सुमारें वीस वर्षें झालीं आपले उभयतांचें लग्न झालें व समजा वयांत येऊनल्लणजे रजोदर्शन होऊन सहा वर्षें झालीं यादरम्यान सुमारें च्यार वर्षें तुमचे येथें मी होतें व दोन वर्षें मी आपले आई बापाचे घरीं आहे यादरम्यान आपला उभयतांचा स्त्रीपुरुष संबंधी व्यवहार घडावा परंतु तुमचे आंगीं पुरुषत्व नसल्याकारणानें त्याप्रमाणें झालें नाहीं दरएक दिवस तुमची मी वाट पाहिली परंतु काहींच उपयोग झाला नाहीं हल्लीं माझे तारुण्याचे दिवस असल्याकारणानें मजला स्टस्टो क्रमाप्रमाणें आचरण करणें जरूर आहे याजबद्दल खामगांव येथें तुम्हांस पंचाइती करितां बोलाविले असतां आला नाहीं शेवटीं तुम्ही एके दिवशीं येथें कडबा विकण्याकरितां आला होता तेवेळेस तुम्हांस समक्ष पंचांनीं विचारलें असतां जबाब दिला कीं तूर्त मजला जाऊ द्या एक महिन्यानीं येईन आणि मजमध्यें पुरुषत्व आहे किंवा नाहीं याची परिक्षा देईन पुढें तुम्ही आला नाहीं शेवटीं हल्लीं खामगांवीं बाजार करण्याकरितां आला होता त्यावेळेस तुम्हास पंचानीं विचारलें कीं तूं आपली पुरुषत्वाची परिक्षा देऊन आपले जिनसास घेऊन जावे तर तूं व तुझा भाऊ व तुझा चुलता व तुझे गावचे पाटील असे चौघे मिळून आमचे घरीं पाच सहा दिवस राहून तुजला पंचानीं विचारलें कीं तूं आपली पुरुषत्वाची परिक्षा दे तर तूं कांहीं परिक्षा न देतां निघून गेला सबब तुम्हास ही नोटिस देण्यांत आली आहे तर तुम्ही या नोटिशीचे तारखेपासून आठ दिवसांचे आंत पुरुषत्वाबद्दल खात्री करून द्यावी आणि मजला आपले घरीं घेऊनजावें अगर मजला फारकत द्यावी म्हणजे मी चालीप्रमाणें आपदेहाची व्यवस्था लावीन व असें जर तुम्ही न कराल तर लग्नसंबंध तोडण्याबद्दल तुम्हावर दावा करून दोन वर्षें बापाचे घरीं होते त्याचा खर्च भरून घेण्यात येईल कळावें ता० २१ माहे जुलई सन १८७० इसवी.

( सही ) जानकी मर्द महादू वाहकर पेठ खामगांव इचे हातची निशाणी असे.

नोटिस, माधव वलद पुंजाजी वस्ती पिंपरी खोदरी तालुके जळगांव जिल्हा अकोला यासीं खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं ज्या तुम्ही माझ्या बापाच्या नावच्या खोट्या फारकती केल्या आणि मजवर ज्ञातींत नाहीं या विषयीं आरोप घेतला. तर तो सर्व खोटा आहे आणि मी आपली बायको बाळगण्यास खुशी आहे. परंतु तुझें म्हणणें आहे कीं मी अद्याप पावेतो वयांत आलो नाहीं सबब पाठवीत नाहीं तर तुजला या नोटिसीनें असें कळवितो कीं तू मजवर जाती भ्रष्ट म्हटलेस व त्याजबाबीं खोट्या फारकती केल्यास त्या मला बिलकूल मजूर नाहींत आणि मी वयांत आल्यावर माझी बायको माझे घरीं तुजला पाठवि भाग आहे. व ह्या संबंधी फिर्याद वगैरे करणें जाहाल्यास फिर्यादीचा खर्च व या नोटिसीचा खर्च तुजला द्यावा लागेल कळावें तारीख १८ जुलई सन १८७०

( सही ) सखाराम वलद बोंदर लिंग राहाणार सुटाळ तालुके मलकापूर जिल्ह बुलढाणें याची हातची निशाणी

नोटिस माहादु वलद तानाजी जोखार वस्ती मौजे शेळगाव तालुके बाळापूर यांस खालीं सही करणार इनकडोन देण्यांत येतें जे माझे नोटिसीचें उत्तर ता० ११ जून सन १८७० चे वऱ्हाडसमाचार पत्रांत दिल्हें ते हालीं माझे पहाण्यांत आलें त्यावरून तुला कळवितें कीं तू आपले नोटिशींत जो मजकुर लिहिला तो अगदी खरा नसून सर्वस्वीं खोटा आहे. जर खरा असता व तूं पुरुषत्वांत असतास तर मला सहा वर्षें बाहेर राहू देता असें न घडतें आतां तूं धिटाईचा जबाब देऊन मी आपले घरीं यावें असें कळवितोस तरी अजूनही माझी त्याविशी तक्रार नाहीं माझा सहा वर्षांचा पोटखर्च दरमहा रुपये ४ प्रमाणें रुपये २८८ माझे भावास देऊन मला च्यार जातवाले लोकांसमक्ष इतर बायकांप्रमाणें नांदवीन असें कबूल करून घेऊन जावें व पुन्हा पूर्वीप्रमाणें खटखट करून परत करणार नाहीं अशा बिशीं जामीन द्यावा. ह्याप्रमाणें तूं आजपासून १५ दिवसांत न करशील तर तुझा माझी जरूर नाहीं व तूं आपले नोटिशींत ज्या खरेपणाच्या गोष्टी लोकांस वाटाव्यात अशा लिहिल्यात त्या खोट्या आहेत हें उघड ठरून मी दुसऱ्या खटपटीस लागेन कळावें ता० १९ माहे जुलई सन १८७० इसवी.

( सही ) जानकी मर्द महादू हिचे हातची निशाणी बांगडी असे.

## NOTICE

To.

The general Traffic manager Bombay

The undersigned gives notice that on the 24 th Junuary 1870 he forwarded from Bombay a large Package Cotaining petty packages by Goods Train to Sheagaum. The number of packages so transmitted was 71 but one out of them No 329 is missing The undersigned therefore declares that the said missing package consisting of vermelion be made good and forwarded to him within fifteen days but in default thereof he would be compelled to take legal steps.

( signed } Dewling aya Bhujuug aya. merchaut Balapoor.

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं ज० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्री स आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ८३ आणे

| किमतीचे दराव. | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची आगाऊ देणारास… …६ | | ० |
| साल अखेर … … …७ | | ० |
| सहा महिन्याची आगाऊ … ‥३ | | ८ |
| एक अंकास | | १ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ६१ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ९ रु० ८ आणे.

ही आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र येण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही ह्याचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०१८१

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०।१

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samechar*

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हावर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास अडीच वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं

वऱ्हाडसमाचाराचे मालक

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची व मागील गुदरून गेल्यासालाबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल.ता १ माहे आकटोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL 5 AKOLA :—SATURDAY EVENING— JULY, 30 1870 NO 31

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ३० माहे जुलै सन १८७० इ०. अंक ३१

## देशाभिमान व कळवळा.

मनुष्यांमध्यें खऱ्या विद्येच्या संबंधानें देशाभिमानाची एक वृत्ती बिंबून जाते ही गोष्ट फार चांगली व मोठ्या महत्वाची आहे. युरोपखंडांतील लोक जितका देशाभिमान बाळगतात त्याच्या शतांशही हिंदुस्थानांतील लोक बाळगीत नाहींत याचें कारण हेंच आहे कीं, खऱ्या विद्येचा त्यांच्या मनावर ठसा आहे तसा आपल्या मनावर नाहीं. जुन्या काळीं आपले देशांत विद्या कमी होती असें नाहीं, तरी तिजमध्यें हें देशाभिमानाचें बीजारोपण नव्हतें, व तिचा परिणाम जातिभेदावर जाऊन माणसा माणसा गणित जाति झाल्या. व एका जातीच्यांनीं दुसऱ्या जातीपासून तोकून राहावें, त्यांचा द्वेष करावा, त्यांचा त्रास होईल तें करावें असा देशाचा कल होऊन एकचित्तता व्हावयाच्या जागीं शेंकडो फुटी पडल्या व त्यांचा परिणाम हा झाला कीं, साऱ्या देशाकरितां आपण अभिमान धरावयास पाहिजे व सर्व जातीचा कळवळा देशसंबंधानें आपण करावयास पाहिजे हें बीजच देशांतून गेलें. वास्तविक हा विचार मनांत आला म्हणजे फार वाईट वाटतें. पहा कीं, आपला हिंदुस्थानदेश केवढा विस्तीर्ण, सुख साधनाच्या सोयी यांत किती विपुल, व याची संपत्ती पाहून दुसरीं राष्ट्रें किती लाळ घोटित, परंतु आपल्यामध्यें देशाभिमान व कळवळा नसल्यानें देशाचा धनीपणा आपणापासून दुसऱ्यांनीं हिरावून घेऊन आपल्याच देशांत आपणास ताबेदार व चाकर करून ठेविलें आहे. देशाच्या विस्तीर्ण भागाविषयीं राहो, पण तुळशी फुलांकरितां आपण जानतें पाडें करें तर इंग्रजांस त्याचे स्वामित्व द्यावें लागतें. तसाच सुख साधनाच्या आमच्या सर्व सोयी पाहिल्यातर आम्ही आतां चाकरी, कशी तरच दोन प्रहरीं जाडी भरडी भाकरी खाऊं, नाहीं तर उपाशी मरूं अशी स्थिती आहे. मोठाले बंगले, त्या भोंवताली मोठाले बगीचे, आंत हौसेचें व मोलाचें सामान, चाकर माणसें पुष्कळ, पगार हजारो हजार रुपये हीं सुखसाधनें मनुष्यास असतील तर तीं मनुष्यें हिंदुस्थानांत प्रस्तुत आम्हीं नव्हत. काबाडकष्ट करणारी म्हणून जी प्राण्यांत एक जाति आहे ती आम्ही आहों. व आमच्या संपत्तीविषयीं आतां पाहिलें तर सुदामदेवाच्या अठरा विश्वें दरिद्र संपत्तीविषयीं पुराणांतरीं जें वर्णन आहे त्याच्या अनुभवाचा सुमार दिसतो. अहाहा! बांधवहो, काय ही दैन्यवाणी स्थिति! सारांश आपल्या देशास मागील काळापासून जें एक प्रकारचें वळण लागलें तेणेंकरून देशाभिमान आम्हांमध्यें आला नाहीं व जातिभदाचीं बंडें माजलीं. ब्राम्हणांनीं आपणास भूदेव म्हणविलें, दानास अधिकारी ब्राम्हण, भलत्संतर्पणास ब्राम्हण, ईश्वराचा मार्ग दाखविण्यास ब्राम्हण, त्यांवाचून दुसरी जात व डोकें करणारी नाहींच असें झालें होतें. व इतर जातींची संख्या ब्राह्मणाहून फार भारी असल्यामुळें व हें श्रेष्ठत्व अपमतलबी आहे असें त्यांस दिसूं लागल्यामुळें त्यांची यांची एकचित्तता झाली नाहीं. बरें ब्राम्हणांत तरी ऐक्य म्हणावें तर नाहीं, त्यांतही आणखी शेंकडो भेद आहेत मिळून असंख्य जाति झाल्या आहेत. त्यामुळें एकाचा दुसऱ्यास कळवळा नाहीं. आमच्या हिंदुस्थानच्या लोकांची कुटुंबाची स्थिति जरी पाहिली तरी तिजमध्यें विशेष प्रेम किंवा ममतेचा धागा दिसत नाहीं. हातभर जमीनीच्या तुकड्यासाठीं व यःकश्चित मानापानासाठीं सख्खे भाऊ भाऊ यामध्यें तंटे पडून खून होतात किंवा जन्माचीं वाकडीं पडतात, तेव्हां अशी जेथें मनोवृत्ती सजली गेली तेथें देशाभिमानाची गोष्ट कशी उपतिष्ठावी! परंतु ईश्वराची मोठी कृपा कीं, हल्लीं या विद्येचा प्रकाश आपणावर पडत आहे तर आतां आपला देश आपणास दिसूं लागेल. व कालांतरानें चांगला देशाभिमानही आपणांमध्यें येईल. युरोपखंडामध्यें जर्मनी देशांत लढाई होणार तेव्हां तेथें युद्ध करणार शिपाई जखमी होतील म्हणून इकडे हिंदुस्थानांत जर्मन देशचे जे साहेबलोक आहेत ते वर्गणी जमा करून आपले देशांत त्या शिपाईलोकांस सहाय करण्याकरितां पैसे पाठवित आहेत. व आपले पगारांतून प्रति महिन्यास अंश देण्यास सिद्ध झाले आहेत. हें देशाभिमानाचें वळण आमच्या लोकांनीं न्याहाळून पाहून तें हृदयांत ठसवावें असें आम्ही इच्छितों.

## लढाई.

युरोपखंडांतील फ्रान्सच्या व प्रशियाच्या लढाईच्या वर्तमानें या आठवड्यांत जीं आलीं आहेत त्यावरून सध्याचा प्रकार कांहीं दिसत नाहीं. व लढाईची अल्पस्वल्प सुरुवात ही झाली असें कळतें. लढायी उत्पन्न करण्याची आगळीक फ्रेंचाकडून झाली पण ती ठरल्यावर जी उतावळी व्हावयाची ती प्रशियाकडून चालू आहे. फ्रेंच लोक अघाडीस येण्याच्या पूर्वींच प्रशियनांनीं त्यांचे हद्दींत जाऊन नद्यांचे पूल मोडले व रेलवेचा दोन ठिकाणीं बिघाड केला. कार्लींग कडे प्रशियन शिरले होते पण फ्रेंचांनीं त्यांवर तुटून पडून त्यांस तेथून हाकून लावलें पुन्हा सारब्रूक एथेंही दोहो पक्षांच्या सैन्याची गाठ पडून थोडी चकमक उडाली. फ्रेंच लोकांनींही गडबड करण्याची सुरवात केली. फारबाक एथें त्यांच्याकडून गोळी बार उडेल असा रंग दिसतो. त्यांचा हेड क्वार्टर म्हणजे फौजेचा मुख्य ठिकाण मेस एथें आला आहे. प्रशियन लोकांनीं आपल्या पाहिल्या मोहऱ्याची दिशा बदलून काब्लेन्स व मेयन्स कडे जाण्याचा रोख धरिला आहे. या प्रमाणें लढाईची हाल चाल आहे.

वर्टंबर्गचें संस्थान प्रशियास मिळालें. रशियाचा बादशाहा खचित प्रशियास मिळेल असें वाटत होतें व त्या प्रमाणें गेले आठवड्यांत वर्तमानही होतें पण तें खोटें ठरलें. रशियानें तूर्त कोणासच न मिळतां लढाईचा रोख पहाण्याचें चालविलें आहे. जर आपणास फ्रेंचांचा संसर्ग लागेल तर मात्र त्याविरुद्ध आपण उठूं असा त्याचा मानस आहे. रशियाचें सहाय प्रशियास मिळतें तर त्याचें बळ दुणावतें, आणि त्या प्रमाणें आज झालें नाहीं तरी पुढें मागें तसें होईल असें म्हणतात. प्रशियाचा जुना शत्रू आस्त्रिया तो तर फ्रेंचास अवश्य मिळेल असें वाटत होतें पण तो मिळाला नाहीं. राजकीय कावे मोठे खोल असतात म्हणून त्यांचीं धोरणें एकाएकीं कोणास कळत नाहींत. युरोपांत हीं जीं मोठमोठालीं पांच सात राष्ट्रें आहेत त्यांच्या लढाईच्या वगैरे गोष्टी एकमेकांस कळाव्या असें त्याचे त्यांचे नेम ठरलेले आहेत असें असतां फ्रेंच व प्रशिया यांचा या लढाईपूर्वीं एक तह ठरत होता व त्याचा मसुदा झाला होता आणि तो प्रशियानें नाकबूल केला यामुळें रहित झाला असें वर्तमान बाहेर पसरलें आहे व वर्तमान पसरलें एवढेंच नव्हे तर लंडनच्या टैम्स पत्रांत तो मसुदा छापला आहे यावरून तेथील पार्लमेंट सभेंत बाटाबाट झाली व त्या बद्दल फ्रेंच आणि प्रशिन यांस विचारून त्यांचे जबाब आणवावे असें ठरलें. ही खटपट खरी ठरली तर यांत इंग्लंडशांचा अपमान आहे असें लोक समजतील कारण इंग्लिश राज्य युरोपांत प्रबळ असून संकेतिक नेमाप्रमाणें तह वगैरेच्या मसलती त्या दोघांनीं यांस कळवावयास पाहिजे होत्या व त्या कळविल्या नाहींत तेव्हां ते इंग्लिशांस कदाचित् जुमानीत नसावेत अशी लोक खटपट करणार नाहींत काय! आम्हास वाटतें कीं, फ्रेंचाचें व आमच्या सरकारचें चांगलेंसें मेतकूट आहे असें नाहीं. व लढाईत फ्रेंचांची मूळ आगळीक होती त्यापक्षीं प्रशियास इंग्लिश मिळेल तर ती एक त्यांची बाजी राहती, पण कोणासच आम्ही अनुकूल होत नाहीं असा इंग्लिशांनीं जाहिरनामा लावला हें मोठ्या शूरत्वाचें धाडस नव्हे व अशीच स्थिती फ्रेंचाची असती तर ते तिऱ्हाइतासारखे न राहते व कांहीं गडबडगुंडा करिते अशी कल्पना आहे.

सुधारणेच्या शिखरावर खेळत असलेल्या या दोन्ही राज्यांनीं वर्तमान पत्रांचे बातमी दारांस लष्करा बरोबर रहाण्याचें मना केलें आहे असें कळतें. हें फार वाईट आहे. खरीं वर्तमानें लोकांस न कळल्यानें फार गोंधळ होईल व लोणकढ्या बाता चहूकडे पसरतील.

प्रशियाच्या राजपुत्रानें सेनापतिपण घेतलें आहे व जर्मनीच्या सर्व संस्थानिकांस प्रशियानें असें कळविलें आहे कीं, एकादे लढायींत तुमचा पराभव झाला तरी डगमगूं नका व शेवटपर्यंत फ्रेंचाचा पिछा पुरविण्याचें काम आपण व आम्हीं मिळून दृढनिश्चयानें करूं.

हें लिहुन पुरें करितों तों मुंबईचीं कालचीं वर्तमानपत्रें आलीं त्यांत लंडनाहून तारायंत्रांतील बातम्या आलेल्या छापल्या आहेत त्या अशा:—

लंडन, ता० २६ जुलै.

गेल्या सोमवारीं बासकैन परगण्यांत निडरब्रोन एथें दोन्ही फौजांची गाठ पडून लहानशी चकमक झाली.

प्रशियाचे सर्व सैन्य तयार झालें त्याचा सेनाधिपतीचा असा बेत आहे कीं, जर्मनीमध्यें रणांगण माजूं देऊं नये.

प्रशिया देशांत इंग्लंडचे मिनिस्टर (मंत्री) आहेत त्यांनीं तहनाम्याच्या खरड्याची गोष्ट खरी असल्याचें लिहिलें आहे.

फ्रेंचाचे मिनिस्टर इंग्लंडांत आहेत त्यांनीं फ्रान्सच्या राजाची अशी इच्छा कळविली आहे कीं इंग्लंडचें सख्य उत्तरोत्तर वाढावें. तहनाम्याचें मूळ बोलणें कौंट बिसमार्क प्रशियोन प्रधान यांनीं काढिलें होतें परंतु तें दोन्ही बाजूकडून नाकबूल झालें

पारिस, ता. २७ जुलै.

सरकारी आजच्या वर्तमानपत्रांत लिहीलें आहे कीं प्रागू एथील तहनामा झाल्याहून पुढें बर्लिन एथें प्रशियाचे प्रधान व फ्रेंचचे वकील यांजमध्यें अशा तहनाम्या संबंधीं तोंडा तोंडीं थोडें बोलणें झालें होतें ते बादशहानें नाकबूल केलें.

एम. ओलिवर फ्रेंचाचे प्रधान यांनीं असें प्रतिपादन केलें कीं फ्रेंच व इंग्लंड यांच्या सख्यत्वाची व भरवशाची आम्ही मोठी किंमत समजतों. आणि या दोहो राष्ट्रांचें ऐक्य हें जगाच्या सुस्थितीला अति आवश्यक आहे असें आम्हीं सर्वकाळ मानून आहों. तहनाम्याच्या मसुद्याचा पुकारा इंग्लंड व फ्रान्स यांचा बिघाड व्हावा असें इच्छिणाऱ्या पुरुषांनीं केला आहे व तो समूळ खोटा आहे असें आम्हीं सोत्कंठ सांगतो.

लंडन, ता० २७ जुलै.

प्रशियांतील सेमी आफिशल म्हणजे अर्धवट सरकारी बातमी वरून समजतें कीं या तहाचा मसुदा सन १८६६ च्या पूर्वीं प्रशिया सरकारच्या दप्तरीं होता. व तो कौंट बेनिडिटी फ्रेंचाचे वकील यांचे हातचा लिहिलेला होता व त्यावेळीं फ्रान्सानें प्रशियास वचन दिलें होतें कीं तीन लक्ष फौजेनिशी आस्त्रियावर हल्ला करण्यास आम्हीं तुम्हांस मदत करूं.

रोम एथें फ्रेंच सैन्य आहे तें त्यांनीं सर्व लढायीस जलद बोलाविलें. पोपाच्या राज्याचें रक्षण आतां इटली सरकारानें करावें असें त्यांचें म्हणणें आहे.

याप्रमाणें लढाईसंबंधीं वर्तमान आहे·

## वर्तमानसार

मुंबईइलाख्याच्या विद्याखात्याच्या डायरेक्टर साहेबांनीं सरक्युलर केलें आहे कीं, सन १८६९ सालापासून जे नवीन मराठी मास्तर झाले आहेत त्यांनीं नवीन रूळीप्रमाणें दोन वर्षांचे आंत परिक्षा द्यावी, नाहींपेक्षां त्यांस सहा महिन्यांची नोटिस देऊन काढून टाकिलें जाईल.

विलायतेस सिव्हिल इंजिनियरचे कामाकरितां परिक्षा झाली तींत ७० उमेदवार होते पण कोणत्याच विषयांत कोणी परिक्षेचे यत्तेप्रमाणें पास झाला नाहीं असें कळतें. या जागा ४० भरावयाच्या आहेत.

सिंध प्रांतांत बारा वर्षें मोजणीचें काम चालू आहे तें या वर्षी पुरें होईल असें समजतें.

या आठवड्यांत मुंबईहून चाइना नावाची आगबोट विलायतेची डाक व उतारू घेऊन निघाली होती ती १०० कोस जाऊन यंत्रांत कांहीं बिघाड झाल्यामुळें दुसरे दिवशीं परत आली. मग दुसरे आगबोटींतून तिजवरील डाक व उतारू गेले.

चिनाकडील वर्तमान तारायंत्रांतून भयंकर आलें आहे. आवा एथें कांहीं गडबड होऊन १४०० लोकांची कत्तल झाली. तसेंच तैंतीस व एथील चिनी लोक परदेशीय लोकांवर हत्यार उचलून उठल्याचें वर्तमान आहे. त्यांनीं फ्रेंच वकिलांस व कांहीं युरोपियन स्त्रियांस ठार मारिलें व त्यांच्या इमारती जाळिल्या. पेकिन एथेंही फ्रेंचाचा प्रधान व राशियनलोक यांस ठार मारल्याची बातमी आहे. मोठी लढाई होईल असा रंग दिसतो.

इराणच्या व काबुलच्या बादशहांचा परस्पर सल्ला झाला व ते एकचित्तानें वागूं लागले असें आलीकडे वर्तमान आलें आहे.

कैलासवासी जगंनाथजी शंकरशेट यांचा विलायतेस पुतळा तयार होत होता तो पुरा होऊन मुंबईस येऊन दाखल झाला.

हिंदुस्थानांत येणाऱ्या नळाऊ व इमारतीच्या लाकडावरील तशीच यांत्रिक कामासंबंधी लाकडावरील जकात माफ झाली.

बाबू केशव चंद्रसेन यांची विलायतेस अकस्मात प्रकृति बिघडली आहे. ईश्वर करो आणि त्यांस लवकर आरोग्य होवो.

नाशिकच्या इंग्लिश शाळेची परीक्षा झाली. अभ्यास चांगला असल्या बद्दल मास्तराची वाखणणी झाली. व २१ मुलांस ६० रुपयांचीं बक्षिसें वाटलीं. या शाळेंत १६९ विद्यार्थी आहेत.

नगरास एक पाण्याचा नळ बांधून आणित आहेत त्यास सुमारें साडेदहा हजार रुपये मुंबईचे एक पारशी गृहस्थ मि० दिनशाजी माणकजी पेटीट यांनीं दिले. हें औदार्य स्तुत्य होय.

अमेरिकेंतील एक कारागिरानें एक नवीन वाजा, असा तयार केला आहे कीं, त्यांतून मनुष्याच्या आवाजासारखे सर्व प्रकारचे आवाज निघतात. ज

आमच्या ऐकण्यांत आलें आहे कीं, आमचे उपशंकराचार्य, ज्यांनीं स्वामीस इतकी मदत केली व कांहीं ब्रम्ह सभांमध्यें पुढारीपणा घेतला, ज्यांनीं आपली योग्यता नसतां लोकांस उपदेश करण्याचें

काम आपण हाऊन अंगावर घेतलें ते वेदशास्त्र शून्य आप्पाशास्त्री नातू ह्यांनीं ह्या पत्राचे प्रोप्रायटर व एडिटर मिळून त्यांजवर पंधरा हजार रुपयांची अब्रूचें नुकसान केल्याची फिर्याद केली आहे. न्यायाच्या कोर्टासारखी जागा ह्या वादाचा निकाल होण्यास दुसरी आम्हांसही दिसत नाहीं ह्याकरितां उपश्रीनें जें केलें हें फार चांगलें केलें असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. पण असो, सूस कोर्टांचे जज्ज मुक्तीच नंबर होनचें द्वार उपश्री. बाळाजीपंत दादांसारख्यांचे नातू ह्यांची अब्रू पंधरा हजारांचीच काय?

ज्ञा. प्र.

सिव्हिलसर्विस यंदाच्या सिविलसर्विसच्या परीक्षेंत एक एतद्देशीय गृहस्थ पास झाले; परंतु त्यांच्याही वयाविषयीं तकरार सिविल सर्विस कमिशनसें यांजपुढें आलीं आणि त्यांचें प्रकरण घोटाळ्यांत पडलें.

इं. प्र.

## कांपिटिटीव परीक्षेकारितां अकोल्यास पैशाची आवश्यकता.

आजचा या सभेचा हेतु सर्व जमलेल्या सद्गृहस्थांस कळलेलाच असावा असें वाटतें, तरी मी खुलाशानें कळविण्यास सर्वांची परवानगी घेतों. आपले वऱ्हाडांत शाळाखात्याकडे प्रतिवर्षीं नोवेंबर महिन्याचे सुमारास सांही जिल्ह्यांतील शाळांतील निवडक निवडक मुलें ऐकत्र जमवून त्यांची परिक्षा घेण्याचा पाठ आज पांच वर्षें मेहेरबान डाक्टर सिंक्लेर साहेब बहादूर विद्याखात्याचे डायरेक्टर येथें आल्यापासून चालू झालेला आहे सर्व हिंदुस्थानांत ही तऱ्हा नवीन असून फार उत्तम व विद्येच्या कामीं मुलांस ईर्षा, चढाओढ, व फायदा करून देणारी आहे—विलायतेहून सिविलसर्विसचे साहेब लोक जी परिक्षा देऊन इकडे चाकरीवर येतात ती परिक्षा याच तऱ्हेची आहे. हिला कांपिटिटीव परिक्षा असें म्हणतात. कांपिटिटीव म्हणजे चढाओढीची परिक्षा-अमक्या शाळेंतील मुलांच्या अभ्यासापेक्षा आपला अभ्यास चांगला ठरावा व त्याकरितां आपले मास्तरांची प्रशंसा व्हावी असें जो तो सद्गुणी व आवेशी मुलगा इच्छित असतो. तर कार्यतीप्रमाणें तशाची चढाओढ पहाणें हेंलील किती मौजेचें व आनंदकारक आहे! या विषयींचा प्रत्यक्ष अनुभव वऱ्हाडास पांच वर्षें आहे व म्हणून येथें अधिक सांगावयास नको. मुंबई इलाख्यांत वगैरे शाळांच्या वार्षिक परिक्षा होतांना आम्ही पाहिल्या आहेत तेथें एका शाळेंतच विद्याधिकारी जाऊन तेथील मुलांची परिक्षा घेतात तेवढेंच काय तें. दुसऱ्या ठिकठिकाणच्या शाळांतील परोपरीचे अनेक विद्यार्थी येऊन त्या परस्परांच्या गाठी पडून त्यांचीवृध्दी, विद्या, कौशल्य गुण, वर्तना इत्यादि नजरेस पडण्याचा तशा ठिकाणीं वर्षेंच्या वर्षें कधींच प्रसंग येत नाहीं व इकडे आमच्या वऱ्हाडांत हें शाळाखातें नवीनच झालें असून मेहेरबान डाक्टर सिंक्लेर साहेबांनीं थोड्या काळांत तें चांगल्या स्थितीस आणिलें आहे व अशा उत्तम परिक्षेचा थाट एथें वार्षिक ठेविला आहे तेव्हां ही एक विद्यामंदिराची यात्राच म्हटल्यास शोभण्या सारखी आहे व ही उत्तम गोष्ट साहेब बहादुरांच्या दीर्घप्रयत्नानें घडून येत आहे म्हणून त्यांचे उपकार मानणें अगदी जरूर आहे.

सन १८६६ व सन १८६७ या दोन वर्षीं ही कांपिटिटीव परिक्षा आपल्या अकोल्यास झाली. अकोल्याची तेव्हांची आणि आतांची स्थिती पाहिली असतां महदंतर दिसून येतें व हें उघड करून सांगावयास नकोच. दिवसाच्या उजेडा प्रमाणें सर्वांचे नजरेपुढें टळटळीत दिसत आहे आहु पंचवीस, पन्नास, पाउणशें कोसावरून पांच पन्नास शाळांतून दोन तीनशें अल्पवई व कोवळ्या मनाचे नाजुक मुलगे आपले आई बापांस सोडून कोशभर कोठें गेलेले नव्हते ते येथें यावयाचे तेव्हां त्यांची सोय घरच्या प्रमाणें येथें चांगली व्हावी, त्यांस त्रास होऊं नये व त्यांच्या प्रकृती बिघडूं नयेत या विषयीं जपणें किती अवश्यक आहे हें येथें जमलेल्या दयाळु मनाच्या थोर थोर ग्रहस्थांस त्यांची गोजिरवाणी बचडीं असतीलच व त्यांस किती जपावें लागतें त्यावरून माहित आहेच, असो पाहिल्या दोन वर्षीं अकोल्यास जमलेल्या मुलांचे बरेच हाल झाले. त्यांस पाहिजेत तशा निवाऱ्याच्या जागा मिळाल्या नाहींत, जेवणाची चांगली सोय झाली नाहीं, कित्येकांस तर झाडाखालीं उतरावें लागलें, उघड्यावर जेवण करावें लागलें, व बिननिवाऱ्याच्या अशा भणभणीत जागेवर निजावें लागलें. तेव्हां मेहेरबान डायरेक्टर साहेबांस व कोमल मनाच्या दुसऱ्याहि कित्येक गृहस्थांस वाईट वाटलें आणि त्यांनीं मनांत आणलें कीं अकोल्यापेक्षां उमरावती शहर मोठें आहे, तेथें सावकारी चांगली आहे, घरें निवाऱ्याचीं चांगलीं व पुष्कळ आहेत व लोकांस हौस बरी दिसते याकरितां कांपिटिटीव परिक्षेचा थाट तेथें करावा असें साहेब बाहादुरांनीं मनांत आणून उमरावतीस जाऊन तेथील लोकांची सल्ला घेतली तेव्हां त्यांनीं मोठ्या आनंदानें व उत्साहानें परिक्षेची सर्व सरबराई करून देण्याचें पतकरिलें. त्यावरून सन १८६८ सालची परिक्षा तेथें झाली व लोकांनीं कबूल केल्याप्रमाणें उत्तम प्रकारची मदत दिली हें पाहून विद्यावृद्धीच्छु सकल लोकांस मोठा संतोष वाटला. उमरावतीकरांनीं परिक्षा दोन महिने पुढें आहे तों वर्गणीची यादि तयार करून एक निवडक मंडळी नेमिली व मुलांस राहण्यास जागा आणि इतर सर्व प्रकारचीं साहित्यें सिध्द केलीं. नंतर मुलें व मास्तर परिक्षेकरितां आले ते जसे काय लग्नाचे वऱ्हाडी! त्यांस पुष्कळ पुठ्यानीं राहण्याकरितां मोठमोठाल्या सुंदर हवेल्या, स्नानास उष्णोदक, शाकोदनाचें भोजन, व रात्रीं अभ्यासास मेणबत्या वगैरे अशी टुमदार सोय करून दिली कीं त्यांनीं व त्यांच्या मास्तरांनीं बालंबाल खुश व्हावें, असें केलें. व या सर्व सोईबद्दल त्यांस एक पैसाही खर्च पडूं दिला नाहीं. मंडळीनें वर्गणीनें पैसे जमवून त्यांतून धर्मार्थ हा खर्च केला. मग तर काय! आधीं चांगली सोय व त्यांतून बिन खर्चाची, म्हणजे दुधांत साकर म्हणावयाची, याप्रमाणें सन १८६८ सालचे परिक्षेचा समारंभ झाला. नंतर सन १८६९ सालास परिक्षा कोठें करावी या विषयीं डायरेक्टर साहेब विचार करीत होते तों उमरावतीचे उदार लोकांनीं कळविलें कीं आमचे मनांतून यावर्षींही ही परिक्षा उमरावतीसच होऊं द्यावी असें आहे. तेव्हां साहेबांनीं अकोल्याचे स्थितीचा पुन्हा विचार करून व उमरावतीस पूर्ववर्षीं जें सौख्य झालें तें मनांत आणून त्यांच्याच हौसेकडे ढोल दिला. व सन १८६९ सालचाही परिक्षेचा समारंभ पहिल्याहून दोन कांकणें अधिक असा उमरावतीकरांनीं सांग सिध्दीस नेला. याप्रमाणें अकोल्याच्या व उमरावतीच्या दोन दोन वर्षांची हकीकत झाली, आतां सन १८७० हें पाचवें वर्ष आलें आहे व या वर्षीं नजिक आलेली कांपिटिटीव परिक्षा कोठें व कोणते प्रकारें व्हावी हा आजचा विचार आहे.

पहिलीं दोन वर्षें अकोल्यास व दुसरीं दोन वर्षें उमरावतीस परिक्षा झाल्यानें दोन्ही भागांची समसमान पाळी फिटली व आतां पाचवे वर्षाची म्हणजे या चालू सालची पाळी आपले अकोल्यावरच आली आहे हें उघड आहे. तेव्हां हे आमचे अकोल्याचे येथें जमलेले सद्गृहस्थहो, तुम्ही परिक्षेकरितां मुलें व मास्तर जमतील यांची तजवीज यावर्षीं कशी काय करणार? त्यांस झाडाखालीच जागा देणार? वाऱ्यांत च थंडीनें कुडकुडविणार? व पोटापाण्याचे सोईकरितां त्यांचेंच हात भाजणार काय? तुम्हांस तें मागील वस्तुस्थितीवरून निर्दोष वाटेल पण उमरावतीकरांबद्दल तुम्हांस ईर्षा नाहींच काय? अहो, हीं बच्चीं बच्चीं तुमचींच मुलें दुसऱ्या शाळेंतील मुलांशीच ईर्षा धरून परिक्षेंत किती आवेश दाखवितात! आणि तुम्हीं त्यांचे वडील होतात तें उमरावतीचें बरोबरीचे भागीदार असून तिच्याहून वरचढ पणा करावयाचा राहो पण तिची बरोबरी तरी कराल कीं नाहीं? न कराल तर तुमच्या नांवास बट्टा आहे. उमरावतीकरांचें आणि तुमचें भाऊबंदकीचें नातें आहे. आणि तुम्ही परिक्षेच्या मुलांस प्रथम दोन वेळां हलवायाचें आणि भटबुंध्येचें दुकान दाखविलेंत व मागून उमरावतीकरांनीं तुम्हांवर वचिस्व करून त्या मुलांस सुग्रास भोजन घातलें आणि आतां फिरून तुम्हांवर पाळी आली आहे त्या अर्थीं तुम्हि आतां उमरावतीकरांवरही थोडी जास्त कडी करावयास पाहिजे अशी तुमची मन देवताच तुम्हांस सांगेल, नाहींपेक्षां पुढलें वर्षीं उमरावतीकर तुम्हांस हिणावतील व तुमच्या अनुत्साहाची टीका करतील याजकरितां ही अणीबाणीची वेळ समजून सर्वांनीं मिळून अकोल्याचा नक्षा राखावा हें फार आवश्यक आहे.

आतां आपणास काय करावयास पाहिजे आहे याचा थोडा विचार करूं. अकोल्याची हल्लींची स्थिति तीन वर्षांच्या मागल्या स्थितीपेक्षां पुष्कळ अंशीं सुधारली आहे हें आरंभास मीं सांगितलेंच आहे. म्हणजे येथें नव्या नव्या इमारती आतां पुष्कळ झाल्या आहेत तेव्हां चांगली योजना केली तर मुलांस व मास्तरांस रहा

त्याकरितां चांगल्या व निवाऱ्याच्या जागा मिळतील यांत संशय नाहीं. दुसरी गोष्ट उमरावतीस जी एक टुमदार झाली ती अन्नदानाची होय. व ती करण्याचें आपण अकोल्याचे मंडळींनीं मनावर घेतलें असतां अधिक किंवा शक्तीबाहेर आहे असें मुळींच नाहीं. आपल्या शास्त्रांतूनही सांगितलें आहे कीं अन्नदानासारखें पुण्य नाहीं. आणि तें आपल्या कर्तव्यकर्माकरितां व कीर्तीकरितां आपण झटत असतां अकस्मात प्राप्त होत आहे तर एवढें मोठें पुण्य आपण हातचें का घालवावें? यांत धर्म व कीर्ति दोन्ही आहेत. उमरावतीच्या माहितीवरून मला असा अनमान मिळाला आहे कीं या कामाकरितां रकमही फार मोठी लागेल असें नाहीं. सुमारें २०० मुलें आठ दिवस दुवक्त जेवतील तर सुमारें ३००० पात्रांचें साहित्य करावें लागेल व त्यास सुमारें सातशें किंवा आठशें रुपये खर्च लागेल. तर एवढी रकम आपल्या आजच्या एवढ्या मोठ्या समुदायांत जमा होण्यास अशक्य आहे असें मला तर बिलकूल वाटत नाहीं. माझ्या समोर बसलेले हे सावसावकार देवाचे घरचे असे लोक आहेत कीं यांनीं मनावर घेतल्यास आठ असामीच आठशें रुपये देऊं शकतील. परंतु या सभेच्या व्यवस्थापकांची तशी इच्छा नाहीं. धर्मसंबंधी पुण्याचा भार बांधावयाचा तो आपल्या अकोल्यांतील येथें असलेल्या सर्व समुदायाकडून बांधावा असें ते मनापासून इच्छितात म्हणून कोणावर विशेष ओझें न पडूं देतां दसकी लकडी आणि एकाचा बोजा याप्रमाणें सर्वांनीं या कामास हात लावावा हें फार चांगलें आहे.

या अकोल्यास अशा मासल्याचें हें कृत्य पहिलेंच आहे आणि उमरावतीकरांनीं आपणास मार्ग दाखविला आहे तर हें आपण मोठ्या हौसेनें व ईर्षेनें केलें पाहिजे असें मला वाटतें, व सर्व विद्वज्जन सभासदांसही वाटेलच. बहुत गोष्टींत आपलें अकोला शहर उमरावतीचें साम्य करितें, व कित्येक गोष्टींत अकोला उमरावतीचें वरचढही आहे उमरावती पूर्ववऱ्हाडचें मुख्य शहर आहे, अकोला पश्चिम वऱ्हाडचें मुख्य शहर आहे. सुशील व उदार मनाचे लोक तिकडे आहेत व इकडेही आहेत. सावसावकार तिकडे आहेत, शहरवानानें इकडेही आहेत. रेलवे तिकडे आतांशी होत आहे, इकडे पहिलीच झाली आहे. लष्कराकरितां च्यार लक्ष रुपयांच्या बराकी अकोल्यास केल्या आहेत, त्या उमरावतीस नाहींत. लाख रुपयांचा अकोल्यास पूल होत आहे तो उमरावतीस नाहीं. रयतचा मोठा भाग अकोल्यास आहे, उमरावतीस नाहीं. टाउनहाल अकोल्यास होत आहे, उमरावतीस नाहीं. इत्यादि अकोल्याच्या गोष्टी उमरावतीशीं बरोबरीच्या व विशेष भूषणार्ह अशा असून त्यांकरितां आपण गर्व करितों तर या परिक्षेच्या ८०० रुपयांच्या वर्गणीकरितांही उमरावतीची बरोबरी करण्याचा गर्व आपण कां करूंनये? अलबत करावा. आतां उमरावतीचा सावसावकारी अकोल्यापेक्षां फार मोठा आहे हें मी कबूल करितों पण तेवढ्या मोठ्या सावसावकाऱ्याची प्रस्तुतच्या आमच्या या छोटेखानी कामाकरितां गरजही नाहीं असें मला वाटतें. जर दहा वीस हजार रुपये जमवावयाचे असते तर आपण आपल्या अकोल्याच्या सावसावकाऱ्याचा पसारा लहान म्हणून दीनवाणेपणानें उमरावतीच्या तोंडाकडे पहात बसलों असतों, परंतु तेवढ्या रकमेची आपणास मुळींच गरज नाहीं, आपणास सारे सात आठशें रुपये जमवावयाचे आहेत व तितके रुपये म्हणजे आमच्या या बसलेल्या लालाजींच्या केवळ तळहातावरील मळ आहे असें मी समजतों. व हें माझें म्हणणें यांच्याकडून खरें ठरलें जाण्यास ईश्वरानें त्यांस या कामीं सढळ हात सोडण्यास सद्बुद्धी द्यावी असें मी त्याजवळ मागतों.

च्यार दिवसांपूर्वीं या गोष्टीकरितां लायब्ररींत सभा भरली होती तेथें माझ्या कित्येक मित्रांनीं अशी शंका काढली होती कीं आपणास या कामास पाहिजे इतका पैसा अकोल्यास केवळ जमणार नाहीं म्हणून खामगाव आपले अकोल्याजवळ आहे तेथेंही जाऊन वर्गणीची यादी करावी व रकमेची भर करावी. हे माझे सन्मित्रहो, अकोल्याविषयींची जी माझी शुभेच्छा आहे ती मला या विचाराकडे ढुंकुनही पाहूं देत नाहीं. एवढ्याशा च्यार शेंशळी रुपयांकरितां अकोल्यानें केविलवाणें तोंड करून खामगावास जाऊन काय म्हणावें? हे खामगांवच धनिकहो, दातेहो, उदार गृहस्थहो, उमरावतीशीं बरोबरी मानापानाच्या व दुसऱ्या पोकळ गोष्टींत आम्हीं पुष्कळ करीत आलों पण आज शिक्षेचें तोंड खुलें करण्याचे कामीं उमरावती आमचे आकाशास लावणार आहे तर तुम्हीं आमच्या लज्जेचें रक्षण करा. आम्हीं तुम्हांकडे याचना करण्यास आलों, आम्ही पदर पसरतों, व भिक्षांदेहि म्हणतो. च्यार शेंशळी रुपये धर्मादायाच्या व कीर्तीच्या आणि ईर्षेच्या कामांत आमच्याकडून जमेनात तर तेवढा तुम्हीं आम्हांस धर्म करा, तुम्हास पुण्य लागेल, व आमची अब्रू बचावेल. असें का तुम्हीं खामगावकरास जाऊन म्हणणार? नको ईश्वरा, अकोल्यावर तसा प्रसंग आणूनको. अशा भिकेपणानें खामगावाहून जें द्रव्य आणावयाचें तें द्रव्य नव्हे मला वाटतें अब्रूचा घात करणारें तें एक प्रकार विष होय. सबब आम्ही आपले चांगल्याची इच्छा करितों तर सदरहू विचाराची इच्छा तुम्ही करूं नये.

मला वाटतें मीं स्वैर बोलून आपल्या बऱ्याच अमोलिक वेळाचें आज हरण केलें. तर मित्रहो, बुधहो, ज्ञातेहो सद्गृहस्थहो, जें मी इतकावेळ सांगितलें तें केवळ शुद्ध अंत:करणानें तुमचे मनोल्हासास उत्तेजन व जागृती यावी याकरितांच दोन शब्द बोललो. बाकी तुम्हाविषईं माझी निष्कपट पूज्यबुद्धी आहे. तुमचे ठायीं माझी भक्ति आहे, तुमचे औदार्याविषईं माझें मन चांगली कल्पना करितें, व हल्लींच्या या कार्याचीही तुम्हांकडूनच उत्तम प्रकारें सिद्धि होईल असा मला भरवसा आहे.

---

मागाहून आलेल्या नोटिसा.

नोटिस—मनोरखा वलद लालखा मुसलमान वस्ती कंझर तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार यानकडून देण्यांत येते कीं तूं वऱ्हाडसमाचार-पत्रांत नोटिस दिली ती पावली व त्याप्रमाणें तुमच्या समक्ष आमच्या वह्याही पाहिल्या. आणि वह्यांत जी बाकी निघाली ती उद्या आणून देतें म्हणून कबूल केलें त्याप्रमाणें अद्याप दिलें नाहींत करितां ते रुपये ८ दिवसांत द्यावेत न दिल्यास फिर्याद केली जाईल. सदरील बाकी शिवाय नागपुराहून आणविलेल्या कापडांत तुमची आमची सरकत असून त्यासाठीं तुम्ही आम्हापासून रुपये १८२९ नेले होते पैकीं रुपये १४०० दिले बाकी ४२९ देणें राहिले आहेत ते रुपये व सदरहू कापडाचे खरेदी विक्रींत झालेला नफ्याचा आकार असे एकंदर रुपये व त्या खरेदी बाबद दलालाचे सहीच्या यादी व विक्रीबद्दल तपशीलवार याद्दी अशा आम्हास आणून दाखवून नफ्याचा आकार ठरवावा व त्यासह रकम द्यावी. याचप्रमाणें पेंढाकाळी तालुके मेहेकर येथें रुईव गठ्ठ्याचा व्यापार केला त्यांतहीं सरकत होती त्याबद्दलही हिशेब खरेदी विक्रीचा सदरील मुदतींत द्यावा ह्या मुदतींत तिन्ही बाबदीचा निकाल करावा न केल्यास मुदतीनंतर तुम्हावर फिर्यादी केल्या जातील. कळावें ता० २७ माहे जुलई सन १८७० इसवी.

ताजाकलम सदरील मुदतींत नोटिशीचे खर्चासह निकाल न झाल्यास पुढें तुम्हाकडे जी रकम येणें आहे त्या रकमेस दरमहा दर शेकडा ३ रुपये प्रमाणें व्याज चालू होईल. तारीख मजकूर

(सही) नानकराम संतुकलाल वहिवाटदार केसोराम दस्तुर खुद.

---

नोटिस—रामलाल लखमीचंद दुकान खामगांव यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते ऐशीजे आमचें दुकान तुम्ही भाड्यांनीं घेतलें आहे त्याचें भाडें ३१ महिन्याचें येणें त्याचा हिशेब करून आलेला वसूल वजा जातां जी बाकी येणें ती आजपासून ८ दिवसांत द्यावी व दुकानही खालीं करून द्यावें. व ह्या मुदतींत दुकान व भाडें न दिल्यास पुढें दुकानचें भाडें दरमहा रुपये १२ प्रमाणें घेतलें जाईल कळावें ता० २७ माहे जुलई सन १८७०इसवी.

[सही] हावशीलाल तुळशीदास दस्तूर खुद.

---

नोटिस—रावजी वलद गंगाजी पाटील मौजे कावसे बुद्रुक तालुके अंकोट यांस नर्साजी वलद लक्षुमणजी पाटील सावरकर राहाणार कावसे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं पांडूजी वलद बापुजी पाटील राहाणार अंजनगांव यांणीं माझ्या मार्फत सोईरिकीचे कामाकरितां खर्चण्यास तुम्हांस रुपये दिल्हेले इसम मजकूर यांस वापस दिल्हे नाहींत व तें कामहि तुमचे कडोन घडोन आलें नाहीं सबब त्याणें त्या रुपयाबद्दल दिवाणींत मजकूर दावा करून खर्चासुध्दा रुपये ९० नक्त भरून घेतले वरून तुम्हास कळवितों कीं सदर्हू रुपये नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत उलगडून द्यावे न द्याल तर दिवाणींत दावा करून वरील लिहिले पय दोहोत्रयाचे व्याजानिशीं या नोटिसिचे खर्चासह भरून घेण्यांत येतील.

(सही) नरसाजी वलद लक्षुमणजी पाटील निशाणी हातची.

---

नोटिस रामजी वलद राघोजी सुतार राहणार सांगळूद तालुके आकोळे यासी खालीं सही करणार यानकडून नोटिस देण्यात येते कीं तुम्हाकडेस आमचे रुपये ३५ पस्तीस व व्याज असे येणें आहे ते आज पासून एक महिन्यांत आमचे येथें आणून द्यावे न दिल्यास फिर्याद करून नोटिसिचे खर्चासुद्धां रुपये भरून घेऊ कळावें तारीख २८ माहे जुलई सन १८७० इ.

(सही) परशराम वलद कृष्णाजी पाटिल दस्तुर गणपतराव पाटिल दस्तुर खुद

---

नोटिस—जानजी वलद राघोजी पाटिल वस्ती मौजे निंबारी प० व ता० मलकापूर यांस खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुमचे व आमचे मिरासी भाऊ बंदकी संबंधीं हिशाचें शेत जांबराईवाले. हें आमचे सह्याशिवाय तुम्ही छोटमलकाळूराम याजवळ गहाण ठेविलें त्यात सर्व शेत गहाण टेवण्याचा तुम्हांस अधिकार नाहीं. कारण त्यांत आमचे हिसे असोन हल्लीं पर्यंत वहिवाट शुरू आहे. त्यास सदर्हू गहाण टाकिल्यानीं होणे तर कांहीं नाहीं परंतु काल कज्जा फिर्याद वगैरे करणें लागून त्यापासून सर्व नुकसान होईल तर तुम्हांस भरून द्यावें लागेल. हें जाणून काय करणें तें करावें कळावें तारीख २८ जुलई सन १८७०

(सही) रघू वलद शंकर पाटिल व मकन वलद विरसींग पाटिल वगैरे वस्ती मौजे निंबारी तालुके मलकापूर.

---

नोटिस—बयाजी वलद खंडू माळी वानखेडे रहाणार मौजे खडपगांव तालुके मलकापुर जिल्हा बुलढाणें यांस खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं, माझें तुमच्याशीं लग्न लागल्यास सुमारें २० वर्षें झालीं लग्न झाल्यावर मजला सुमारें सहा महिने तुम्ही आपले घरीं नांदविलें नंतर पुन्हा माझे बापाचें घरीं पाठविलेत त्यानंतर सुमारें ९ वर्षांनीं मजला घेऊनगेलात तेव्हांसुमारें एकवर्षपर्यंत ठेविलेत नंतर पुन्हा माझें बापाचें घरीं पाठविलेत त्यास सुमारें नऊ वर्षें झालीं त्या तागाइत तुम्ही मजला ननीशारस्तेप्रमाणें नांदविण्यास नेलें नसोन तुम्ही दुसरें लग्नही केलें आहे यावरून आतां ममबरोबर तुमचा संसार करण्याचा इरादा नाहीं असें उघड दिसतें त्यावरून नोटिस देते कीं, मी पूर्वीं बापाचें घरीं ९ वर्षें राहिलें त्याबद्दल दरसालचें रुपये ६० अन्नवस्त्राबद्दलचा आकार रुपये ५४० व पुढें वर्षें ३ त्याचें घरीं राहिलें त रुपये १८० व ६ वर्षें बाप खर्च करण्यास असमर्थ झाल्यामुळें तिऱ्हाईत मनुष्याचें येथे निरवाहार्थ राहिलें त्याचे रुपये देणें ते सदरील दराप्रमाणें ३६० एकंदर रुपये १०८० आजपासून आठ दिवसांत आणून द्यावे व तूं जन शिरस्त्याविरुद्ध मजला न नांदविण्याची वगैरे वहिवाट केलीस सबब मी सदरील मुदत सरल्यावर दुसरे तजविजीस ला

गेन मग तुम्हां हरकत एकणार नाहीं कळावें तारीख २१ जुलै सन १८७० इ.

( सही ) सुपडो मर्द बयाजी माळी बानखेड हल्लीं वस्ती सजनपुरी पठ खामगांव नि० नांगडो.

## वऱ्हाड

मलकापूरचे माजी तहशिलदार मि० बशीर अली पेनशनांत काढिले आहेत पण त्यांचें पेनशन अजून ठरून आलें नाहीं. त्यांस तूर्त मलकापुरास तहशिलदारीचे जागेवर पाठविलें आहे. तेथील तहशिलदार मि० त्रिंबकराव यशवंत यांची योजना काय झाली तें कळलें नाहीं. बुलढाण्याचा तर कांहीं संसर्ग नसेलना?

इलिचपुरचे पोलिस इनस्पेकटर मि० डुनियासिंग यांस बुलढाण्यास नेमिलें आहे.

सन १८७० चा १० वा आकट सार्वजनिक कामांकरितां जमिनी घेतल्या असतां त्यांचें कंपन सेशान म्हणजे मोबदला देण्याविषयीं झालेला आहे तो वऱ्हाडांस लागू केला.

बुलढाणा— तारीख २० माहे जुलई सन १८७० इसवी. उदईक आठ दिवस होतील मेघराजाची वृष्टी सतत चालली आहे. लहान सान ओढयांस व नाल्यास किती एक वेळां पाणी येऊन सभोंवतालचा गांव जलमय झाले होते. आतां पेरणीचें काम आटपून तूर्त च्यार दिवस शेतकरी लोक विसावा घेत आहेत. आसमंतात हीं नवीन उगवलेल्या धान्यानें हिरवीगार दिसून मनास फार शोभा देतात. आजपर्यंत पडलेल्या पर्जन्यावरून असा अनुमान होतो कीं यंदा पिकें चांगलीं येतील व गरीब गुरिबांस धान्य स्वस्त मिळेल. रोगराई कांहीं नाहीं. कोठें कोठें तापाची साथ आली आहे असें ऐकतों.

देऊळगांवाकडून खटल्याची बातमी विशेष लागली नाहीं. फक्त पोलीस सुपरिंटेंडेंट साहेबानीं आपले बरोबर तिकडच्या पांच कैदीस आणिलें आहे. व त्यांस निरनिराळ्या ठिकाणीं ठेऊन सहाव्या कैदीस दोन च्यार कोसांवर देऊळघाट मुक्कामीं ठेविलें आहे. पोलीस इनस्पेकटर साहेब अद्यापी देऊळगावासच आहेत आणि तेथें आणखी कांहीं कैदी करणें आहेत ते करून साक्षी पुराव्याचे बंदोबस्ताची यथास्थित तजवीज झाल्यावर येथें येतील. मग चवकशीस सुरवात होईल असें वाटतें. सध्या कैदी पोलीसच्या ताब्यांत असून रिमांडावर आहेत. हा महिना गणतीचा रिमांड दिसतो.

या खटल्यास सुरवात झाल्यापासून आमचे डिपुटी कमीशनर साहेबांचें पित्त खळबळून गेल्यासारखें होऊन त्यांणीं आपले एक शिरस्तेदारास अकोल्यास रवाना केलें व दुसऱ्यास तूर्त घरीं बसा म्हणून सांगितलें आणि कचेरींतील आणखी तीन च्यार कारकुनांच्या तालुक्यांत बदल्या केल्या यास आपल्या हाताखालील सर्व महकम्याचा संशय आला आहे असें ह्लोचे त्यांच्या एकंदर वहिवाटीवरून दिसून येतें. मेहेकरतालुक्याचे पोलिस इनस्पेकटर यास भरून आणण्याकरितां वरंटही गेलें आहे. तारीख या मोकदम्याचा दोष किती एक चिफ कितीएक पोलीस इनस्पेकटर, तहशीलदार एकस्ट्रा अ० कमिशनर वगैरे मोठमोठीं धेंडें यांजवर आहे असा बोभाट आहे. कैदी कोळेक बाजी नारायण वकील यांचे घरांत सदरहू कामदारांचे स्वदस्तुरचे लेख सांपडले आहेत असें म्हणतात त्या खटल्याचा तपास डिपुटी कमिशनर साहेब फार बारकाईनें व गुप्तपणें करीत आहेत बातमी अगदीं बाहेर फुटू देत नाहींत या संबंधानें बाजारांत देखील लागणीं बंगल्यांत होत असतें, कचेरींत होत नाहीं आतां याचा काय परिणाम होतो तो पाहावा. लोकांची इतकीच आशा आहे कीं तें काय खरें असेल ते व्हावें मारून कुटून मुसलमान केल्याप्रमाणें मात्र होऊनये म्हणजे झालें.

इलिचपुर—( मित्राकडून ) तारीख २९ जून सन १८७० रोजीं कसबे शिरसगांव येथें गेली मर्द भोळाराम माळ्याचा हो मरण पावली. तथील सुरेभान पाटील यांणीं मुद्याची गोष्ट छपवून उगाच संशय पोलिसास कळविल्यावरून पोलिसानीं प्रेत डाक्टरकडे पाठविलें असतां सोमलखाल्ल्यानें मरण पावली असें निष्पन्न झालें नंतर पोलीस इन्स्पेकटर तपासास गेल्यावर तिजला कोणी विष देऊन मारिलें असें उघडकीस आलें आणि पाटील व नकुरासही ही गोष्ट माहीत होती असाही पुरावा झाला. याजकरितां सर्व लोकास पोलिस सुपरिटेंडंटकडे पाठविले असतां त्यांनी कळील शिरस्तेदार मि० भरतराव चीफ का० यांणीं सुरेभान पाटला जवळून ६० पन्नास रु. ठरावून त्यापैकीं १५ रुपये लांच घेतला या गोष्टीची परिस्फुटता होऊन साक्ष पुराव्यानिशी मि० याजवर अपराध शाबीत झाल्याकारणानें त्यांणीं कोट पाटलोणाचा त्याग करून ह्रस्व विन भावाचे घरांत जाऊन सहा महिने पावेतों कुदळी पावड्याचा अंगीकार केला आहे. अशा लबाड लोकांमुळेंच बिचारे चांगले इमानदार नेटिव लोकांचे वर्तणुकीसही कळंक लागतो असो आतां मि० यांणीं अपील केलें आहे पुढें पहावें.

### अकोला

गेल्या रविवारीं सकाळीं एथील मराठी इंग्लिश शाळेंत गांवांतील थोरथोर कामदार, वकिल, व सावकार लोकांची सभा भरली होती तिचा उद्देश, येत्या नोव्हेंबर महिन्यांत कांपिटिटीव परीक्षा अकोल्यास होणार तिजकरितां काय तजवीज केली पाहिजेत त्याचा विच्यार करावा, हा होता. अध्यक्षस्थानीं रा. रा. श्रीकृष्ण नरहर एकस्ट्रा असि० कमि० हे होते. रा० रा० श्रीराम भिकाजी बी. ए. डिपुटी इन्स्पेकटर यांचे सूचनेवरून रा० रा० खंडेराव बाळाजी फडके यांनी सभेचा हेतु, कर्तव्य, व पुढील योजना याविषयीं एक लेख वाचिला. नंतर वर्गणीची यादी झाली. तींत त्याच बैठकींत ६६० रुपये जमले व अजून सुमारें ३०० रुपये जमतील असा अनमान आहे या औदार्यां बद्दल आम्ही एथील लोकांची तारिफ करितों. या सभेंत वाचलेला कागदआज दुसरे पृष्ठावर छापला आहे वर्गणीचीयादीपुढें देऊ.

उदईक प्रातःकाळीं ताजना पेठेंतील लोकांची याच कामाकरितां तहशिलदार कचेरींतसभा भरणार आहे तिची हकीकत पुढें लिहू.

या आठवड्यांतही पर्जन्य मनस्वी झाला. काल व आज मात्र चांगली उघाडी आहे या पावसानें लायब्ररीची नवी इमारत पडली. तशाच स्टेशनाजवळ बराकी बांधल्या आहेत तेथेंही थोडी पडापड झाली.

गेल्या रविवारीं मढीस पूर आला होता त्यांतून मामलेदारांकडील जप्ती कारकून गणपत नावाचे 'सांगडी बाल्याने स हायानें जात असतां सांगड तुटून वाहून गेले त्यांच्या प्रेताचा अजून पत्ता लागला नाहीं.

आमचे पोलिस चिफ कानस्टेबल मि० पॅरिस साहेब यांनीं महा सात दिवस त्याचा बहुत तलास केला व अजून करीत आहेत.

## जाहिराती.

नाटेस—एकाआपा वलद इसाअपावाणी मिसवत मुळचंद गंगाराम साहू दुकान खरडे तालुके मळगांव यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही वऱ्हाडसमाचार पत्रांत तारीख १३ जून सन १८७० इसवीची नोटिस आमचे नांवाची दिली तींत लिहिलें कीं दुकानाचा व हिशेब वगैरे मुळचंद गंगाराम साहू यांचे सुपूर्द देऊन त्यांजपासून एक रुपयाचे स्टांपावर तारीख १० एप्रिल सन १८७० इसवीची पावती घेतली म्हणोन वगैरे लिहिता तर ती नोटिस आम्हास पावली नाहीं परंतु नोटिस आमचे नावची आहे असें समजल्यावरून तुम्हांस कळविण्यात येते कीं दुकानचा मोहोनत आमचा आम्हास समजून देण्याचा असतां तसें न करून नसून अनधिकारी वाईट मरजीनरूप वर्तन तसा समजून दिला. तुम्ही आपले ठिकाणीं बनत असाल आम्ही मोकळे झालों परंतु तुम्ही वास्तविक समजा कीं जें कृत्य तुम्ही केलें ते कायदेशीर नाहीं व आज पासून होणारा परिणामही फार वाईट आहे. सबब या नोटिशीनें तुम्हास अगाऊ सूचना देण्यांत येत आहे कीं कायदेशीर व शास्त्राधिकारी आम्ही असतां अनधिकारी वाईट हिशेब आणि दुकानचा मोहोनत समजून देणें फार अयोग्य आहे कारण कीं जावकांस हिशेब किती व कसा समजत असतो याची तुम्हास स्वतां माहिती असतां पुरतेपणी विचार केला नाहीं. वास्तव ही नोटिस पोहोचल्या पासून दुकानचा सर्व मोहोनत जितका तुम्हाकडे आमचा आहे तितका रितीप्रमाणें पंधरा दिवसाचे आंत न दिल्यास वाईं मजकुरापासून दगाबाजीची पावती तुम्ही हस्तगत केल्याबद्दल वगैरे इलाज करण्याकरितां फौजदारी कोर्टांत रितीप्रमाणें तजवीज करण्यात येईल व दुसरी म्हणजे दिवाणी कोर्टाचे रितीप्रमाणें सर्व दुकान वगैरे ताब्यात घेण्याची तजवीज या नोटिशीचे खर्चासह करण्यांत येईल हें समजावें. तुम्ही जी नोटिस दिली ती देण्याची आम्हास गरज होती कारण आम्ही प्रथम नोटिस दिल्या बरोबर तुम्ही आम्हापाशीं येऊन सर्व निकाल करावयाचा होता हें काम कायदेशीर असतां न करून स्वयें नोटिस दिली ही तुमची लबाडी आणि चूक आहे सबब या नोटिशीचा खर्च तुमचा तुम्ही सोसावा कळावें ता० ३० माहे जुलई सन १८७० इसवी.

( सही ) हिरामण टुकडादास द. खु.

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्रीस आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ०।१ आणे.

| किंमतीचा दराव. | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास ... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| दर महिन्याची अगाऊ ... .. | १ | ८ |
| एक अंकास | | ६ |

या शिवाय बाहेरील लोकास वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व साल अखेर १ रु० ८ आणे.

अगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून १ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारासही मागील हिशेब साफ नवें साल चालू होऊन तेथून १ महिन्याची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचा दर.

१० ओळी पर्यंत ... ... ... १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।१।६

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०।६

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Sameohar*

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. शिवाय मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांत वगैरे कांहीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८१७ चे आकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास आठीच वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यात सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहिण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं

वऱ्हाडसमाचाराचे मालक

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं आजवरची व मागील गुदरून गेल्यासाला बद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धा आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल.ता० १ माहे आकटोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छ. प्र. केलें.